# वाड्यातले दिवस

vejsÛeduleeËej

## १

वाड्यात आता कोणी राहत नाही.

राहण्यासारखे काही आता शिल्लकच नाही. आम्ही ज्या भागात शेवटी राहत होतो ते बळवंतरावदादांनी हौसेने बसवलेले नक्षीदार खणसुद्धा वाळवीने भुगा करून जमीनदोस्त केले आहेत. दादांच्या ओसरीला आम्ही तिकडे राहायला आलो तेव्हाच दोन- तीन ठिकाणी धीरे द्यावे लागले होते. त्याही भागात आता धाब्याला मोठमोठी भगदाडे पडली आहेत. आमच्या जुन्या भागातले धाबे त्यापूर्वीच कोसळून नुसत्या भिंतीच राहिल्या होत्या, त्याही आता अर्धवट उरल्या आहेत. सतत डागडुजीमुळे थोडाफार बरा असलेला रावसाहेबांचा भागसुद्धा पडण्याची चिन्हे दिसू लागल्यामुळे त्यांचा नातू आणि नातसूनही वाडा सोडून गेले आहेत. त्यांच्या जाण्याने वाड्यातली नांदणुकीची शेवटची खूणही संपली. वाड्यातले आतले सगळे बांधकाम वस्तीला निरुपयोगी झाले असले तरी वाड्याची चौदिवारी मात्र अजून भक्कम आहे. दीडशे वर्षांपूर्वी वाडा बांधला गेला त्या वेळी आतल्या चीज-वस्तूचे आणि माणसांचे रक्षण करण्यासाठी भक्कम चौदिवारी बांधण्यात आली होती, पण आता वाड्यात रक्षण करण्यासारखे काहीच उरलेले नाही.

हैदराबाद संस्थानात नोकरी मिळण्याचा संभव असल्याने दूर सोलापूर जिल्ह्यातल्या चपळगावहून एक ब्राह्मण कुटुंब बीडला आले. कुटुंबप्रमुखाला शासकीय नोकरी मिळाली. पुढे त्याला पाच मुले झाली. काही दिवस हे कुटुंब कान्होपंतांच्या हवेलीत राहिले. नंतर त्यांनी धोंडाजीराव देशपांड्यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या धोंडापुरात एक वाडा बांधायला घेतला. कर्ते झालेले पाच भाऊ वाड्यातच वेगवेगळे राहू लागले. पुढे काही काळाने त्यातले दोन भाऊ व्यवसायानिमित्त दुसऱ्या गावी गेले. नारायणराव, लक्ष्मणराव आणि गोविंदराव हे तिघे भाऊ मात्र वाड्यातच राहिले. परगावी राहावयास गेलेल्या भावांचा हिस्सा ज्यांचा काळ चालता होता त्या दोन भावांनी गोविंदराव आणि लक्ष्मणरावांनी विकत घेतला. गोविंदरावांना रावसाहेब म्हणूनच ओळखले जाई. या भावातील वाड्यातच राहिलेले तिसरे भाऊ नारायणराव हे माझे आजोबा. दुव्वम तालुकदाराच्या-उपजिल्हाधिकाऱ्याच्या कार्यालयात फौजदारी कारकून म्हणून ते दरमहा नऊ रुपये पगारावर नोकरी करीत. त्यांना वाड्यातल्या आपल्या मूळ हिश्यात भर घालणे शक्यच नव्हते. वाड्याची पूर्व आणि दक्षिण बाजू रावसाहेबांच्या मालकीची झाली तर उत्तर बाजू आणि पश्चिमेचा अर्धा भाग बळवंतरावदादांच्या ताब्यात आला. माझ्या आजोबांचा हिस्सा मात्र तेवढाच राहिला.

परवा गावी गेलो असताना सहज मनात आले वाडा पाहून यावा. वाड्याला बाहेरून कडी लावण्याचा प्रसंग पूर्वी कधी येत नसे; पण आता मात्र कडी लावलेली होती. दार उघडून ढकलले. दाराला आतून लावण्याची अगळ आणि ती सरकू नये म्हणून खोबणीत ठेवायचा लाकडाचा चौकोनी तुकडा बाजूच्या ओट्यावर कोणी तरी काढून ठेवला होता. दरवाज्यातून आत आल्यावरच्या दर्शनी दोन खणी जागेत एका बाजूला एक खण ओटा आहे. रावसाहेबांकडे आणि नंतर काकांकडे येणारे पक्षकार कोर्टाच्या तारखेला किंवा रविवारच्या बाजाराला बीडला आले म्हणजे याच ओट्यावर बरोबर आणलेली भाकरी खात. ओट्याच्या मागेच असलेल्या आडाचे पाणी शेंदून घेत.

वाडा म्हटले की एखादा रुमाल किंवा फेटा बांधणारा, गलेलठ्ठ मिशा असणारा जाडजूड कर्ता माणूस आणि त्याच्या इशाऱ्याखाली नांदणारा वाडा अशी प्रतिमा डोळ्यांसमोर येते. रावसाहेबांना कर्त्या प्रमुखाचा मान असला तरी त्यांचे रूप असे नव्हते. किरकोळ अंगकाठीचे रावसाहेब आपले वकिलीतले कर्तृत्व, मोठा लोकसंग्रह, सद्वर्तन आणि दातृत्व यांच्यामुळेच लोकप्रिय होते.

दर्शनी खणातून अंगणाकडे वळले की डाव्या बाजूला रावसाहेबांचा भाग येई. लागूनच ओसरी असली तरी आलेल्या माणसाला समोरची बैठक अगोदर दिसे. सात-आठ खणांची ही सलग बैठक हा वाड्यातला सगळ्यात मोठा व येणारजाणारांचा वावर असलेला भाग होता. बैठकीत दक्षिणेकडच्या भिंतीच्या गिलाव्यात नक्षीकाम होते आणि त्यातच एक आरसाही बसवलेला होता. उत्तम दिवाणी वकील म्हणून रावसाहेबांचा लौकिक होता. राजवट मुस्लिम असली आणि बहुतेक न्यायाधीश मुस्लिमच असले तरी जिल्हा कोर्टातल्या बहुतेक दिवाणी प्रकरणात एका बाजूने रावसाहेब असतच. त्यांची वकिली तर चांगली होतीच. शिवाय गावातल्या सर्व सार्वजनिक कामांत त्यांचे साह्य आणि मार्गदर्शन असे, त्यामुळे बैठकीत वर्दळ असे.

रावसाहेबांचा दरारा असा की पक्षकारांना अघळपघळ आणि बिनकामाचे बोलण्याचे धैर्यच होत नसे. अगदीच जरुरीपुरते बोलायचे आणि चालू लागायचे. एक बुद्धिमान आणि मेहनती वकील म्हणून त्यांचा लौकिक होता. रावसाहेब नम्रतेने वागत असले तरी आपल्या स्वाभिमानाला जपत.

न्यायाधीशही त्यांच्याशी वागताना मर्यादेने वागत. रावसाहेबांची प्राप्ती चांगली होती. माझी आजी-बाई सांगायची की पक्षकार रावसाहेबांना बंदे रुपये आणून द्यावायचे आणि रावसाहेबांच्या पत्नी मग ते टोपलीत भरून घरात न्यावयाच्या.

रावसाहेबांचा दिनक्रम अगदी आखीव असे. ते कोर्टातून परत आले म्हणजे जवळपासच राहणाऱ्या तीनचार मित्रांना निरोप जाई. मित्र म्हटले खरे पण त्यांतले बहुतेक रावसाहेबांच्या मदतीने उपकृत झालेले होते. ते जमले म्हणजे पत्ते सुरू होत. अर्धापाऊण तास झाला म्हणजे रावसाहेब पत्ते टाकून देत. डाव अर्धा असला तरीही तो पूर्ण करण्याचा कोणी आग्रह धरीत नसे. मित्रमंडळी परत जात आणि रावसाहेब आंघोळीला उठत.

रावसाहेबांना वारकरी भजनाची आवड. जवळपास कुठेही सप्ताह असला तर रावसाहेब एकदा तरी हजेरी लावून येत. मात्र तेव्हाही पहाटे जरी परत आले तरी पाच वाजता अंघोळ करून लगेच कामाला लागण्याचा त्यांचा क्रम चुकत नसे. दरवर्षी एकदा वाड्यातच सप्ताह होई. अखंड भजन चाले. त्यात रावसाहेबही तासभर भजन करीत. अंगणात ६०-७० माणसे त्या दिवसांत जेवत.

रावसाहेबांना मी पाहिले नाही; माझ्या जन्माच्या अगोदरच रावसाहेब गेले. पण त्यांचा अदृश्य वावर त्या बैठकीत आहे असे सतत वाटे. रावसाहेबांच्या बैठकीत मोठी एक पाचखणी सतरंजी अंथरलेली असे. ती आणि एका कोपऱ्यात ठेवलेले लिहिण्याचे मेज हे दोन्ही रावसाहेबांच्या माघारीही तसेच कायम असत. माझ्या वडलांनी- मी त्यांना काका म्हणे रावसाहेबांच्या जवळ वकिलीला प्रारंभ केला होता. याच बैठकीत काकांनी वकिलीची धडे रावसाहेबांकडून घेतले होते. रावसाहेब गेल्यानंतर थोड्याच दिवसांत संस्थानात राजकीय चळवळ सुरू झाली आणि काकांनी वकिलीपेक्षा अधिक वेळ तिलाच द्यायला प्रारंभ केला. तसा वाड्याला चळवळीचा दुरुन स्पर्श पूर्वीच झाला होता. १८९८ मध्ये रावसाहेब याच नावाने ओळखला गेलेला एक गृहस्थ बीडला आला आणि त्याने काही स्थानिक लोकांना संघटित करून निजामाच्या सत्तेविरुद्ध उठावाचा प्रयत्न केला. या प्रयत्नाचा सुगावा लागल्यानंतर सरकारने व्यापक चौकशी केली. चौकशी अधिकारी इ० जे० स्टिफनसन याने प्रत्यक्ष उठावात नसले तरी त्याला सहानुभूती दाखवणारांची नावे आपल्या अहवालात नोंदवली आहेत; त्यात माझे चुलत आजोबा गोविंदराव ऊर्फ रावसाहेब आणि माझे सख्खे आजोबा नारायणराव या दोघांचाही समावेश आहे.

वाड्याच्या दक्षिण-पश्चिम कोपऱ्यातली पाच-पाच खणाच्या दोन वडी असलेली जागा माझ्या आजोबांच्या- नारायणरावांच्या वाट्याला आली होती. वयाच्या चाळिसाव्या वर्षी पहिली बायको वारल्यावर त्यांनी पुन्हा लग्न केले. पंधरा वर्षांची गीता वाड्यात राहायला आली आणि तिचे नाव कमल झाले. पहिल्या बायकोपासून आजोबांना तीन मुलीच झाल्या होत्या. कमलबाईंना मात्र दोन मुलगे झाले. पुरुषोत्तम आणि जनार्दन. पुरुषोत्तम हे माझे वडील त्यांना मी काका म्हणे आणि चुलत्यांना बाबा. दोन्ही मुले लहान असतानाच आजोबा गेले. त्यापूर्वी काही दिवस आजोबांची दृष्टी मंद झाली होती. तेव्हापासूनच आजीने कर्तेपणाचा सन्मान नसला तरी जबाबदारी मात्र स्वीकारली होती. आजीला व्यवहारज्ञान चांगले होते. कुटुंबाने विकत घेतलेल्या जमिनीची वाटणी भावाभावात झाली तेव्हा आजीने नागापूरची जमीन आम्हांला देऊ नका कारण ती पूर्वी मुसलमानाची होती; माझी मुले लहान आहेत पुढे काही भांडण निघाले तर ते माझ्या लहान पोरांना निस्तरता येणार नाही असे सांगून दुसरी जमीन मागितली होती.

आजोबांच्या वाट्याला आलेली जागा म्हणजे पाच- पाच खणाच्या दोन वडी. आतल्या वडीत दार उघडले तरच उजेड यावयाचा. खिडकी वगैरेची भानगडच नव्हती. नाही म्हणायला चुलीच्यावर धूर जायला एक धारे होते. फार धूर नसेल तेव्हा त्यातून थोडासा प्रकाश यायचा. आतल्या वडीत एका कोपऱ्यातल्या खणात थोडीशी स्वयंपाकाची आणि पाण्याच्या साठवणीची भांडी, त्यानंतरच्या तीन खणांत स्वयंपाकघर, त्यातच भिंतीत एका कोनाड्यात देव. शेवटच्या खणात एकीकडे सरपण रचून ठेवलेले आणि दुसऱ्या कोपऱ्यात एक लादणी. लादणीत सामान काहीच नव्हते, एखादा साप मात्र निघे. म्हणून फारसे कोणी आत जातही नव्हते. पण एकदा मात्र सगळी लादणी पोलिसांनीच सगळे गचपण काढून स्वच्छ केली. काका स्टेट काँग्रेसचे काम करू लागले तेव्हा पत्रके काढण्यासाठी चक्रमुद्रणाचे एक मशीन आमच्या घरी होते. ते शोधून जप्त करण्यासाठी आमच्या घराची झडती झाली. अमीनसाहेबांनी फौजदाराने - लादणीसगट सगळे घर धुंडाळले पण मशीन काही सापडले नाही. सापडणार कसे? अमीनसाहेब ज्या खोक्यावर बसले होते त्यातच ते होते. ते खोके मात्र उघडून पाहण्याची बुद्धी त्यांना झाली नाही.

स्वयंपाक सगळा चुलीवर व्हायचा. सकाळी आजी आणि संध्याकाळी आई स्वयंपाक करायच्या. चूल पोतेरे रोज आईने करायचे. रोज येणारी महारीण सकाळी थोडे शेण आणून टाकायची. तिला त्याबद्दल भाकरी वाढायची. घरी भांडी घासायला येणाऱ्या शेवंताबाई भिंती आणि जमीन सारवण्यासाठी आईला मदत करायच्या. पण पुष्कळ वेळा आईलाच शेणाने भिंत आणि जमीन सारवून घ्यावी लागे. वाड्यात फरशी फक्त रावसाहेबांच्या बैठकीत आणि बळवंतराव दादांच्या बैठकीत होती. बाकी सगळी मातीची जमीन. भिंतीचे आणि जमिनीचे पोपडे निघायचे. क्षाराची कमतरता असलेली लहान मुले मग

ती माती खायची. मातीतल्या जंतूंच्या प्रादुर्भावाने अनेक वेळा मुले आजारी पडायची आणि दगावयाची. माझाही एक धाकटा धाकटा भाऊ असाच दीड वर्षांचा असताना मरण पावला.

माझा जन्म आमच्या ओसरीवर अर्ध्याभागात जुनी पातळे दोरीवरून टाकून तयार केलेल्या अंधाऱ्या बाळंतखोलीत झाला. १४ जुलै १९३८ ही माझी जन्मतारीख. पुढे शाळेत मला प्रवेश देताना वडील बरोबर आलेले नव्हते. शिक्षकांनी अंदाजाने एक तारीख माझी जन्मतारीख म्हणून नोंदली. त्यात माझे वय १५ महिने जास्त लागले. मी घरातला पहिलाच मुलगा. त्यामुळे घरची मोलकरीण आणि इतर दोघीतिघींनी हेले घातले. म्हणजे आमच्या वाड्याच्या उंबऱ्यावर घागरीने पाणी ओतले व वाड्याच्या मोठ्या व आमच्या ओसरीच्या दरवाजावर आंब्याच्या पानाची, लिंबाची तोरणे लावली. दहा दिवस हा क्रम असे. त्यानंतर बारशाच्या दिवशी घरात पुरणपोळ्या करून त्या सर्व हेलेकरणींनासुद्धा दिल्या जावयाच्या.

रावसाहेबांना एकच मुलगा. ते म्हणजे माझे चुलत चुलते आबा. त्यांचे कागदोपत्री नाव बाळकृष्ण असले तरी गावात सगळे त्यांना पंडितराव म्हणूनच ओळखत. आम्ही मुले त्यांना आबा म्हणत असू. गोरेपान, तरतरीत नाकाचे उंच आबा धोतर, शर्ट, वर एक फिक्या निळसर रंगाचा कोट आणि काळी टोपी अशा वेशात सतत असावयाचे. हातात एक काठीही असायची. ती आधारासाठी नव्हती, फक्त शोभेचा भाग. आबा व्यवसाय वगैरे काही करीत नसत. दिवसाकाठी कधी तरी एकदा, बहुधा दुपारी आबा वाड्यात यायचे. घरात चक्कर मारून यायचे; पण मुख्यत: बसायचे बैठकीतच. चहासुद्धा बाहेर काकी किंवा दुसरे कोणी आणून देत. चहा घेतला म्हणजे ते मला किंवा माझ्या भावाला सुधाकरला- त्याला ते लाडाने बट्या म्हणायचे- हाक मारत. एक चवली (दोन आण्याचे छोटेसे नाणे) देत आणि चारमिनारची डबी आण म्हणून सांगत. वाड्याच्या बाहेर पडले की कोपऱ्यावरच्या पानवाल्याच्या दुकानात चारमिनार सिगारेटची डबी मिळत असे. एक सिगारेट ओढून डबी खिशात घालून आबा सावकाश वाड्याबाहेर पडत. माझी आजी जर अंगणात पायऱ्यावर बसली असेल तर तिच्याशी एखाददुसरा शब्द बोलत. आबा गेले की त्या बैठकीतला वावर संपुष्टात येई. रावसाहेबांच्या काळातल्या आठवणी काढत आणि दुसऱ्या दिवसाची वाट पाहत बैठक शांतपणे बसून राही.

वाड्याच्या वाटण्या फार पूर्वीच झाल्या असल्या आणि आम्ही आणि आबा वेगवेगळे राहत असलो तरी माझ्या किंवा बाळूच्या माझ्या भावाच्या- बोलण्यात जर आमच्या घरात आणि तुमच्या घरात असे निर्देश आले तर आबा रागवत असत. आपल्या सगळ्यांचे घर एकच आहे तेव्हा आमचे-तुमचे म्हणू नये असा त्यांचा आग्रह असे. आबांच्या दुसऱ्या वाड्यात आम्ही क्वचित जात असू. गरजच पडायची ती कोणाला विंचू चावला म्हणजे. आबांना विंचू उतरण्याचा मंत्र येत असे. विंचू बहुतेक रात्री चावायचे. मग कंदील घेऊन कोणी बरोबर घेऊन आबाकडे जायचे. आबांनी मंत्र टाकायचा आणि आम्ही परत यायचे. आबांच्या मंत्रामुळे अगर जाण्या येण्यात वेळ गेल्यामुळे विंचू हळूहळू उतरायचा.

आबांचे मुस्लिम समाजातील प्रतिष्ठितांशी चांगले संबंध होते. ख्वाजा नावाच्या बीडमधील प्रसिद्ध वकिलाच्या मुलीचे लग्न झाले. त्या काळी मुस्लिम गृहस्थाच्या घरी हिंदू जेवायला जाणे अवघड होते. एखादा ब्राह्मण स्वयंपाकी नेमून वेगळ्या ठिकाणी जेवणाची व्यवस्था झाली म्हणजे हिंदू मित्रांना जेवावयास येता येई. या लग्नात हिंदू निमंत्रितांच्या जेवणाची व्यवस्था आबांनीच आमच्या वाड्यात केली होती. ख्वाजा वकिलांनी धान्य व किराणा पाठवून आबांना व्यवस्था पाहण्यास सांगितले. जेवावयास आलेल्या लोकांचे आभार मानण्यासाठी व स्वागत करण्यासाठी ख्वाजा वकील येऊन गेले.

लक्ष्मणरावांचे चिरंजीव रामचंद्र ऊर्फ बळवंत- माझे दुसरे चुलत चुलते हेही वकिली करत. बळवंतराव दादा त्यांची वकिली मी कळता होण्यापूर्वीच संपुष्टात आली होती. चारदोन उर्दू पुस्तके आणि रुमालात बांधलेल्या फायलींचे काही गठ्ठे मात्र ओसरीवर दिसत. चष्मा घातलेले, एका मेजाच्या जवळ बसलेले पाठीत थोडे वाकलेले दादा फक्त मला आठवतात. आणखी एक दादांचे लक्षात राहणारे चित्र म्हणजे वाड्यातील दादांच्या हिश्याजवळ असलेल्या अंगणाच्या भागात त्यांनी कधीकाळी बसवलेल्या दगडी फरशीची दरजबंदी करणारे दादा. खुरडतखुरडत पुढे सरकत टोपल्यातले वाळू चुन्याचे मिश्रण करणीने दोन दगडांतील भेगांना लावत बसलेले दादा मला आठवतात. असल्या किरकोळ कामासाठी त्यांनी कधी गवंडी बोलावलाच नाही. चुना-वाळू, करणी, टोपली अशी सामुग्री त्यांच्याकडे नेहमी असायची. कामही व्हायचे आणि दादांचा वेळही जायचा. माझे आजोबा नारायणराव किंवा कोणत्याच चुलत आजोबांना मी पाहिले नाही. वाड्यातला वृद्ध पाहिला म्हणजे फक्त दादाच. त्यामुळे त्यांच्या आठवणी अजून जाग्या आहेत.

दादांचा मृत्यू ही माझ्या लहानपणी मी पाहिलेल्या घटनांपैकी सर्वांत खोलवर परिणाम करणारी घटना होती. तीनचार दिवस दादा खोकल्याने आणि श्वासाच्या विकाराने खूपच हैराण होते. दुखणे दम्याचे होते की हृदयाचे, सांगता येणार नाही. त्या वेळी निश्चित निदानाची साधने नव्हती आणि उपचारसुद्धा फार मर्यादित असत. श्वास घेणे कठीण झालेले दादा अस्वस्थपणे एका तक्क्यावर पालथे टेकून पडलेले आहेत आणि कोणी तरी अधूनमधून त्यांची पाठ चोळत आहे, असे ते चित्र माझ्या स्मरणात आहे. घरातल्या सगळ्याच माणसांची चिंताग्रस्त चेहऱ्यांनी चाललेली ये जा पाहून दादांची प्रकृती गंभीर झाल्याचे

सहज लक्षात येत होते. तीनचार रात्री अशाच गेल्या. उन्हाळ्याचे दिवस होते. नेहमीप्रमाणे आम्ही मुले गच्चीवर झोपायला गेलो. सकाळी वर येऊन आईने उठवले आणि मला सरळ आमच्या ओसरीवर ती घेऊन गेली व बाहेर येऊ नको असे सांगून तिने दरवाज्याला बाहेरून कडी लावून घेतली. थोड्या वेळाने मोठमोठ्याने रडण्याच्या आवाज अंगणातून येऊ लागला. आमच्या ओसरीवरच्या खिडकीतून बाहेरचे फारच थोडे दिसत होते. पण काय घडले आहे याचा अंदाज येत होता. दादांचे अंत्यदर्शन मला कोणी घेऊ दिले नाही. पण खिडकीतून जे दिसले ते मात्र मनाला चरकून टाकणारे होते. आमच्या घरी शिक्षणासाठी राहिलेला शेषराव नावाचा माझा मावसकाका राधाकाकींच्या बांगड्या फोडून टाकत होता आणि राधाकाकी आक्रोश करीत होत्या. दादांच्या शवापेक्षा हेच दृश्य माझ्या मनावर अधिक उमटले. पतीच्या निधनानंतर कपाळावरचे कुंकू लगेच पुसून टाकणे, गळ्यातले मंगळसूत्र तोडणे, बांगड्या फोडणे या सगळ्या गोष्टींत जी घाई करण्यात येत असे त्यामुळे त्या प्रसंगाला कारुण्याऐवजी क्रौर्याचीच झाक येत असे. या गोष्टी ताबडतोब करण्याच्या सूचना जमलेल्यातल्या काही उत्साही स्त्रियाच देत असत.

दादांच्या हयातीतच त्यांच्या सगळ्यात मोठ्या मुलीचे लग्न झाले होते. दुसऱ्या मुलीचे- सुमनचे लग्न दादा गेल्यानंतर वर्षभराच्या आतच काकांच्या पुढाकाराने वाड्यातच झाले. काका-आईनेच देवप्रतिष्ठा बसवली होती. माझ्या लक्षात आहे ते दृश्य म्हणजे लग्न आटोपल्यावर नवरा-नवरी एका टांग्यात बसून जात आहेत आणि पाठीमागे माझी आई हातात समई घेऊन पायी चालते आहे. तिच्याबरोबर तीन-चार इतर बायका फक्त आहेत. आमच्या वाड्यापासून भावजी राहत असलेल्या नारायण नाईक औट्यांच्या वाड्यापर्यंत ही वरात गेली होती.

तीस वर्षे वैधव्य आणि दमा सहन करीत आजी जगली; पण तिने नेटाने आपली दोन्ही मुले शिकवली. त्या काळी स्वस्त असलेले घरातले सोने आजीने स्वयंपाकघरातल्या भिंतीत देवघरावरच्या जागेत पुरून ठेवले होते. काका किंवा बाबा शिक्षणासाठी हैदराबादला किंवा औरंगाबादला जायला निघाले म्हणजे त्यातला एखादा तुकडा ती काढून घेई. सोनाराकडे तो मोडून आलेले पैसे ती परगावी निघालेल्या काका किंवा बाबांना देई. घरातले सोने मोडणे हाच योग्य मार्ग आहे हे तिने अनुभवाने ठरवले होते. घरात दोन नथी होत्या. एका गृहस्थाकडे तिने त्या ठेवून त्या तारणावर पैसे उसने आणले. पैसे परत दिल्यावर एकच नथ होती असा वाद घालून सावकाराने एक नथ गिळंकृत केली. पुन्हा कधी आजीने कोणाकडून कर्ज घेतले नाही.

माझ्या आजीचे लग्न वयाच्या पंधराव्या वर्षी झाले आणि २६-२७व्या वर्षी तिला वैधव्य आले. पुढचे सगळे आयुष्य तिने तांबड्या अलवणात काढले. त्या वेळच्या पद्धतीनुसार तिला केशवपन करून सोवळे करण्यात आले. आमच्या वाड्यापलीकडच्या देशपांड्यांच्या सात चौकाच्या वाड्याजवळ राहणारा दगडू न्हावी वाड्यात नेमाने यायचा आणि आजीचे वपन करावयाचा. परसात भांडी घासण्याच्या जागेजवळ एक पोते अंथरून त्यावर बसलेली आजी त्या वेळी मात्र आम्हाला तिकडे येऊ देत नसे.

आजीचे जवळचे हयात नातेवाईक म्हणजे तिचे भाऊ वासुदेवराव. ते माझ्या वडलांचे मामा पण मीही त्यांना मामाच म्हणे. वासुदेवमामा सोनवळ्याला राहत. त्या वेळी या डोंगराळ भागात जायला चांगला रस्ताच नव्हता. अंबाजोगाईपर्यंत बसने जायचे. अंब्याला जायचे. आजीबरोबर बसप्रवास करताना पडद्यात बसायला मिळायचे. सरकारी बसमध्ये चालकाच्या मागे सहा सीटचा एक कोपरा 'जनाना' असे. त्याच्या दोन बाजूने पडदे लावलेले असत. स्त्रियांसाठी राखीव असलेल्या या जागेत गर्दी नसेल तर मुलांनाही बसता येई. वासुदेवमामा अंब्याला घोडे पाठवत. त्यावर आजीच्या पुढे बसून माझा प्रवास होई. वाटेत डोंगरपिंपळा आणि भावठाणा दोन्ही गावात आजीच्या बहिणी दिल्या होत्या. अर्धापाऊण तास त्यांच्या घरी थांबून पुन: प्रवास सुरू होई. घोडे डोंगर उतरू लागले म्हणजे आपण पडू काय की अशी भीती वाटे; पण आजीने घट्ट धरलेले असे.

काका मॅट्रिक झाल्यावर अगोदर दर्जेसुव्वम वकिलीची परीक्षा पास झाले. दर्जेअव्वल आणि दुव्वमसाठी एकत्र होणाऱ्या परीक्षेसाठी दोन वर्षांचा लॉ क्लासचा अभ्यासक्रम करावा लागे. त्याचे वर्ग हैदराबादला होत. वर्षभर वकिली केल्यानंतर काका पुन्हा या शिक्षणासाठी हैदराबादला गेले. तेथे दोन वर्षे शिकल्यावर उच्च न्यायालयाने घेतलेली परीक्षा पास होऊन त्यांनी पुन्हा बीडला वकिली सुरू केली. काका आणि बाबा यांच्या वयात दोन-अडीच वर्षांचे अंतर होते. बाबांना गणित आणि विज्ञान या विषयांची विशेष आवड होती. त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण चालू ठेवण्याचे ठरवले. औरंगाबादच्या इंटरमिजीएट शासकीय महाविद्यालयात त्यांनी प्रवेश घेतला. मात्र इंटरची परीक्षा होण्याअगोदरच महसूल खात्यात नोकरी मिळाल्यामुळे त्यांचे शिक्षण संपले. मैदानी खेळांचीही त्यांना आवड होती.

काकांनी वकिलीला प्रारंभ केला आणि बाबा महसूल खात्यात नोकर झाले तरी आमच्या घरात फारशी समृद्धी आलीच नाही. काकांना चळवळीमुळे सलग वकिली करता आली नाही आणि पक्षकार स्वखुशीने देईल तेवढेच पैसे घ्यावयाचे अशी त्यांची पद्धत असे. आपण नक्कीच जिंकू अशी आश्वासने देणे त्यांच्या स्वभावात नव्हते. नाडल्या गेलेल्या लोकांचाच त्यांच्या पक्षकारात भरणा असायचा. श्रीमंत फारसे त्यांत नसत. वाड्यातल्या आमच्या जागेत पक्षकार किंवा भेटीला आलेल्या माणसाला बसवण्यासारखी जागाच नव्हती. काकांना भेटण्यासाठी गोविंदराव नानल किंवा असे कोणी पुढारी आले म्हणजे रावसाहेबांच्या बैठकीतच त्यांना बसवावे लागे. नंतर

काकांनी आपल्या वकिलीच्या कामासाठी माडी बांधून घेतली आणि पक्षकार व इतरांना येता यावे म्हणून त्याला एक लाकडी जिना अंगणात बसवला. माडीवर पक्षकारांशी काका बोलत पण अनेक अलमाऱ्या व त्यांत भरलेली खूप पुस्तके असे काकांचे सुसज्ज ऑफिस तेव्हा नव्हते. टेबल-खुर्च्याही नव्हत्या. जाप्ते दिवाणी, जाप्ते फौजदारी, कानूने शहादत अशी महत्त्वाच्या कायद्याची सटीक पुस्तके फक्त असत. आमच्या घरी तेव्हा लॉ रिपोर्ट्स नव्हते. मात्र काकांना महत्त्वाचे निवाडे स्मरणात असत. गरजेप्रमाणे पुस्तके कोणाकडून तरी मागवून काकांचे काम भागे.

बाबांचा पगारही तुटपुंजा. अशा स्थितीत काटकसर करण्याशिवाय उपाय नव्हता. अधूनमधून एखादी बाई स्वयंपाकाला मिळाली तर ती पोळ्याभाकरी- बहुधा फक्त भाकऱ्याच करून जाई. वाड्यातल्या आडावर पाणी शेंदण्यासाठी सोपे जावे म्हणून चाक बसवलेले नव्हते. समाईक आड. त्यावर पैसे खर्च करून कोण चाक बसवणार? ज्यांची स्थिती चांगली होती त्यांच्याकडे पाणी काढून घरात आणणारे पाणके होते. ज्यांची नव्हती त्यांच्या सुनांना पोहऱ्यांनी पाणी शेंदून काढावे लागे. आई लग्न होऊन वाड्यात आली तेव्हा माझ्या वडलांनी नुकतीच वकिली सुरू केली होती. आजोबा बऱ्याच पूर्वी वारले होते. कोणताही जादा खर्च परवडण्यासारखा नव्हता. पाणी भरायला आईला फारच त्रास होऊ लागला तेव्हा आजीने एक ब्राह्मण रोज चार घागरी पाणी शेंदून घरात आणून टाकण्यासाठी लावला. चार घागरी म्हणजे निदान बारा- पंधरा पोहरे. या सगळ्याबद्दल महिन्याकाठी त्याला एक रुपया मिळे. चुलीवर भाकऱ्या होताना अवेलूवर दाळ शिजे. नंतर वरण झाले म्हणजे त्याच अवेलूवर कधीमधी थोडासा भात होई. भात रोज दोन्ही वेळा नसे. सणासुदीला पक्वान्न व्हायचे म्हणजे सुधारस. साखरेच्या पाकात मिसळलेला लिंबाचा रस म्हणजे सुधारस. घरात असलीच तर केशराची एखादी काडी त्यात जावयाची. जास्त काही करण्याची शक्यताच नव्हती. अपवाद फक्त दसरा-दिवाळीचा. त्या वेळी इतर पदार्थ होत.

बळवंतरावदादांचे एक जावई जहागीरदार होते. एका देवळाची काही इनाम जमीन त्यांना उपभोगायला मिळत असल्यामुळे त्यांना जहागीरदार हे उपपद प्राप्त झाले होते. आयुष्यभर त्यांनी काही केले नाही. जे होते ते मोडून खाल्ले; पण जहागीरदारी मात्र अगदी अस्सल. दादा गेल्यानंतरही जावई सासुरवाडीला आले म्हणजे काकी त्यांची बडदास्त राखायच्या. दादांच्या वरच्या पत्र्याच्या माडीला जाजमे लावून अधिक आडोसा केला जाई. जावई झोपेतून उठेपर्यंत बहुतेक दुपार झालेली असायची. त्यांचा दिवस मात्र खूप उशिरा संपायचा. रात्री अकरा-बाराच्या सुमाराला सासूबाईंना भजी तळण्याचा हुकूम व्हायचा. पानामध्ये काही टाकल्याशिवाय उठणे हा अर्धवट जेवल्याचा पुरावा आहे असा त्यांचा समज होता. पुरणपोळीवर तूप वाढून चालत नसे. तुपासाठी वेगळी वाटी दिलीच पाहिजे. एकदा त्यांच्याकडे मी गेलो तर नानाला तूप वाढा असे नुसते सांगायच्याऐवजी 'चपळगावकरासारखे नुसते पोळीवर वाढू नका, वेगळी वाटी द्या' असे त्यांनी त्यांच्या बायकोला आणि मलाही चिमटा घेत म्हटले. थोडेसे उद्धट उत्तर मी दिले पण त्यामुळे ताई मात्र माझ्यावर नाराज झाली. सगळ्याच मुलींची लग्ने झाल्यावर राधाकाकींनी त्यांचा-दादांचा हिस्सा आम्हाला विकला आणि त्या गावातच दिलेल्या मधल्या मुलीकडे राहायला गेल्या.

आबांची मुलगी इंदुताई गोरीपान आणि देखणी होती. तेव्हा गावात मुलीसाठी उपलब्ध असलेले सातवीपर्यंतचे शिक्षण तिने घेतले होते. पडदा लावलेला एक छकडा रोज वाड्याच्या दारात येई आणि सरकारी शाळेचा शिपाई 'ताईसाहेब चला' अशी हाक देई व इंदुताईचे दफ्तर हातात घेऊन ताईंना घेऊ जाई. आबांचे जावई एक-दोन वेळाच आल्याचे मला आठवतात. रावसाहेबांच्या बैठकीच्यावर असलेल्या माडीत त्यांची व्यवस्था असे. पांढऱ्यास्वच्छ मोठ्या चादरी बैठकीवर अंथरलेल्या असत. एका बाजूला भिंतीलगत एक छपरी पलंग होता. त्याचा वापर कदाचित त्याच वेळी होई. जावयासाठी एकदा हैदराबादहून मुद्दाम फेण्या मागवल्या होत्या. फेणी आणि दूध हा आम्हांला अप्रूप असलेला खाद्यपदार्थ असे. तो दुरून पाहणेसुद्धा आवडे. सारखे सारखे माडीवर जायला मात्र आम्हाला परवानगी नसे.

उन्हाळ्यात सर्व पुरुष मंडळी आणि मुले गच्चीवर झोपायला जात. पक्की गच्ची फक्त दादांच्या माडीवर, तीही निम्या भागातच होती. वाड्यातल्या इतर सर्व माड्यांवर खण आणि त्यांवर पत्रे होते. त्यामुळे वाड्यातली सगळीच मुले दादांच्या गच्चीवर झोपत. काँग्रेसच्या चळवळीमुळे काका अधूनमधून पण बराच काळ तुरुंगात असत. त्यामुळे मुलांना बाबांची-माझ्या चुलत्यांचीच सोबत असे. आकाश निरभ्र असले म्हणजे बाबा महत्त्वाची नक्षत्रे दाखवीत. सप्तर्षी, ध्रुव अशी काही नक्षत्रे आम्हांला ओळखताही येऊ लागली होती. रात्री कधी तरी एखादे ऊदमांजर गच्चीच्या वरवंडीवरून जाताना दिसे. ते लांबून पाहूनही भीती वाटे. गच्चीवरून अगदीच थोडे मिणमिणते दिवे दिसत. गावात वीज नव्हती. लोकलफंडचे म्हणजे सरकारच्या नगरपालिका खात्याचे कामगार संध्याकाळी रस्त्यावर रॉकेलचे कंदील लावून जात. त्यांचे अस्तित्व आहे एवढेच सांगणारा त्यांचा प्रकाश रस्त्यावर असे. रात्री साडेआठ नऊच्या सुमाराला सर्वत्र शुकशुकाट होई. अगदीच महत्त्वाचे काम असल्याशिवाय कोणी बाहेर फिरत नसे. सर्वत्र शांतता असे. रात्रीच्या अंधारात जवळच असलेल्या पोलिस ठाण्यात दिले जाणारे तासाचे टोल मात्र स्पष्ट ऐकू येत.

बीडला आजूबाजूच्या खेड्यांतून भरपूर दूध, दही, लोणी

येई. दही विकणारे 'दही ऽ ऽ ऽ अशी हाक देत फिरत. लोणी घ्यायचे असेल तर वाड्याच्या दरवाज्यात जाऊन विक्रेत्या बाईला बोलावले म्हणजे ती आत येई. एका मोठ्या टोपलीत एका मटक्यात दही आणि कल्हई केलेल्या पितळी भांड्यात लोणी असे. लोणी साधारणत: एक रुपयास १४ किंवा १६ छटाक असे. दूध गवळ्याचे पण साधारण बरे असे.

माझ्या चुलत्यांची बाबांची- पहिली बायको कॉलऱ्याने दगावली. माझी ही काकी मला आठवतच नाही. तिच्याच धाकट्या बहिणीशी बाबांचे दुसरे लग्न झाले. तिला आम्ही सगळी मुले माई म्हणत असू. माईचा सगळ्याच मुलांना लळा होता. दुर्दैवाने तिलाही प्लेगने गाठले. बीडला दर तीन-चार वर्षांनी प्लेगचा फेरा येई. सर्वच वाड्यात उंदीर-घुशींचा सुळसुळाट असे. वाड्यात राहणारी बरीच मंडळी एक तर परगावी किंवा गावाबाहेर कँपवर राहावयास जात. प्लेगपासून बचावण्यासाठी गाव सोडून बाहेर जाणे आवश्यक आहे हे मित्रमंडळींना पटवून देण्यात काका आघाडीवर असत. गावाबाहेर अर्ध्या पाऊण मैलावरच्या शेतात मध्यमवर्गीय मंडळी पत्र्याच्या कोप्या उभारून त्यात राहत. उन्हाळ्याच्या दिवसांत पत्र्याच्या घरात राहणे हा एक कठीण अनुभव असे. दिवसभर घामाच्या धारा लागल्यानंतर रात्री थोड्या मोकळ्या जागेत साफसफाई करून पुरुष मंडळी एकत्र जमत. बत्तीच्या उजेडात पत्ते, अगर गप्पांचा अड्डा जमे. कधी कधी गणपतराव पत्की मास्तर काही जादूचे प्रयोगही करून दाखवत. कधी लक्ष्मीबाग नावाच्या नगर रस्त्यावरच्या शेतात तर कधी जालना रस्त्यावरच्या श्रीपती-दिगंबर या भावांच्या शेतात आमचे घर वस्तीला असे. राहणे गावाबाहेर असले तरी गावातले व्यवहार अगदीच बंद नसत. आवश्यक किराणा वस्तू, दळण, भाजी आणण्यासाठी गावात जावे लागे.

प्लेगचा शेवटचा फेरा बीडला मी चौथी असताना आला होता. त्यावर्षी आम्ही दिगंबर-श्रीपतीच्या शेतात राहत होतो. या भावांच्या वडलांनी सावकाराला गहाण दिलेले हे शेत काकांनीच दावा करून त्यांना सोडवून दिले होते. काका काही कामासाठी हैदराबादला जाणार होते. मी हट्ट करून त्यांच्याबरोबर गेलो. तेथे आम्ही असताना तार आली की माईला प्लेग झाला आहे. काकांनी लगेच परत जाण्याचे ठरवले. परतीची रेल्वे संध्याकाळीच होती. प्लेगला फारसे उपचारच नव्हते. ताप खूप चढला तर बर्फ ठेवावा असा उपचार सांगण्यात येई. बीडला बर्फ मिळत नव्हता. हैदराबादेहून बर्फ नेता येणे शक्य नव्हते. प्लेग झाल्याचे लक्षात आल्यावर माईला एक वेगळी झोपडी तात्पुरती बांधून तीत ठेवण्यात आले होते. माईच्या सोबतीला माझी आजीही त्याच झोपडीत राहत होती. जालन्याला येऊन तेथून बसने बीडला आम्ही येईपर्यंत माई गेली होती. माझ्या चुलतभावंडांचा सांभाळ त्यानंतर आई आणि आजी यांनीच केला.

बुबू म्हणजे रावसाहेबांची बायको, आबांची आई. बुबू हे साधारणत: मुस्लिम समाजात वृद्ध स्त्रीला वापरले जाणारे संबोधन. पण तेच त्यांच्याबाबत रूढ झाले होते. त्यांच्या ओसरीवर अंगणाच्या बाजूने उघडणारी व जमिनीपासून एक फूटभरच उंचीवर असणारी एक खिडकी होती. अंगणातून होणारी ये जा तीतून दिसे. बुबू या खिडकीजवळ बराच वेळ बसून असत. बुबू आणि माझी आजी दरवर्षी नेमाने पंढरपूरला वारीला जात. बीडहून येडशीपर्यंत बसने आणि तिथून छोट्या रेल्वेने पंढरपूर. वारीच्या काळात गर्दीमुळे मालवाहतुकीच्या डब्यातही प्रवाशांची वाहतूक केली जाई. या दोघी हा सगळा त्रास सहन करीत. दोघी वारीवरून परत आल्या की मुले त्यांच्याभोवती जमा होता. त्यांच्याबरोबर सामान म्हणजे एक एक बोचके फक्त असे. त्यातच त्यांचे कपडे व आमच्यासाठी आणलेल्या वस्तू असत. आजी व बुबू आल्या म्हणजे आम्ही त्यांच्याभोवती उत्सुकतेने जमून बोचके सोडले जाण्याची वाट पाहत असू. खाऊ आणि खेळणी त्यात असणार ही आमची खात्रीच असे. खाऊ म्हणजे चुरमुरे आणि रेवड्या आणि खेळणी म्हणजे कुंभाराने केलेल्या मातीच्या बाहुल्या. या बाहुल्यांपैकी दळण दळणारी मुलगी हे सर्वांचे आवडते खेळणे. बाहुलीचे जाते फिरू शके. शिवाय चंदनी लाकडाची विठोबाची छोटी प्रतिकृतीही त्या कधी आणत. यापेक्षा जास्त काही आणणे शक्य नव्हते. पण आमच्या आनंदासाठी ते भरपूर असे.

## २

मी तिसरी किंवा चौथीत असेन. एके दिवशी वर्ग चालू असताना शेषेकाका शाळेत आले आणि "दप्तर घेऊन चल, तुला घरी बोलावले आहे," असे त्यांनी सांगितले. शिक्षकाची परवानगी घेऊन मी त्यांच्याबरोबर घरी गेलो. काकांना पोलिस पकडून घेऊन गेले होते. मी शेषेकाकाबरोबर पोलिस ठाण्यात गेलो. अमीनसाहेबांच्या फौजदारांच्या- खुर्चीसमोरच्या एका खुर्चीवर काका बसले होते. काकांना पाहताच माझे डोळे भरून आले. अमीनसाहेबांनी माझ्याकडे पाहिल्यावर ते काकांना म्हणाले, "वकीलसाहब, क्यों काँग्रेसके इस झंझटमें पडते हो? बच्चो को कितना दुख होता है." काकांनी मला एक मिनिटभर जवळ घेतले आणि घरी परत जाण्यास सांगितले.

त्या वेळी सगळ्याच न्यायाधीशांना राहण्यासाठी सरकारी घरे नव्हती. एक न्यायाधीश कोतवाल गल्लीत वामनराव वझ्यांच्या वाड्यात राहत असत. एकदा मी रस्त्यात खेळत असताना काकांना हातकडी घालून एक पोलिस घेऊन जात असल्याचे मला दिसले. त्यांच्या मागोमाग मीही गेलो. काका आणि पोलिस अंगणात उभे होते आणि न्यायाधीशांनी आपल्या घरात बसूनच रिमांडचा हुकूम दिला. काकांनी माझ्याकडे पाहिले असणार पण ते काही बोलले मात्र नाहीत. काकांना पोलिस घेऊन गेल्यावर मी घरी परत आलो.

काकांना अटक केली की अगोदर पोलिस ठाण्यात ठेवत

असत. तेथे घरचे अन्न देण्याला परवानगी असे. ठाण्यात जाताना अगोदर थोडी भीती वाटे. त्यातच फौजदार अहमदबक्ष कडक म्हणून प्रसिद्ध होता. प्रत्यक्षात मात्र ठाण्यात मला कधी दटवादटवीचा अनुभव आला नाही. एखाददुसरा कार्यकर्ता त्याच वेळी कोठडीत असेल तर दोघांचेही अन्न येई. तेथे किंवा तुरुंगात नेलेल्या खाद्य पदार्थांपैकी प्रत्येकाचा थोडा भाग खाऊन दाखवावा लागे. हा नियम यासाठी की पोलिसांच्या ताब्यातील किंवा तुरुंगातील आरोपीला विषप्रयोग होऊ नये. काका एकदा पोलिस ठाण्यात होते. घरचे जेवण नेऊन दिल्यानंतर काकांना पाणी हवे होते. ठाण्यातले पाणी स्वच्छ नव्हते किंवा संपले होते. पोलिस ठाण्याशेजारी असलेल्या घरात आड होते. मी आणि माझ्याबरोबर आलेला मित्र त्या घरी गेलो. 'ठाण्यात वडील आहेत, त्यांना पाणी पाहिजे आहे' असे सांगून आम्ही पाणी शेंदण्याची परवानगी मागितली. त्याने सरळ बोलण्याऐवजी ''कसल्या चोऱ्यामाऱ्या करून येतात आणि आम्हांला त्रास देतात'' असे उदगार काढले. त्याचे बोलणे आम्हांला वेदना देणारे होते. पण त्या माणसाचा काही दोष नव्हता. काका कोण व त्यांना कां पकडले आहे हे त्याला माहीत असण्याचा संभव नव्हता.

हैदराबाद संरक्षण कायद्याखाली पंधरा दिवसपर्यंत विनाचौकशी अटकेत ठेवण्याचा पोलिसांना अधिकार होता. रामचंद्रराव देशपांडे, तुकारामपंत भोळे, डॉ. कसरेकर, मदनलाल सारडा अशा काही काकांच्या सहकाऱ्यांना या अधिकाराचा वापर करून तुरुंगात ठेवण्यात येई. चौदा दिवस झाले की रीतसर तुरुंगातून त्यांची सुटका होई. तुरुंगाच्या बाहेर आल्यानंतर सुमोर अर्धाफर्लांग अंतरावर मुख्य रस्ता होता. तेथे असलेल्या एका छोट्या पुलावर बीडचे फौजदार स्वागताला बसलेलेच असत. तेथपर्यंत ही मंडळी चालत आली म्हणजे त्यांना पुन्हा अटक करून पोलिस ठाण्यात नेले जाई आणि पुन्हा दुसऱ्या दिवशी सकाळी तुरुंगात नव्या हुकमाने दाखल केले जाई. एके दिवशी मात्र गंमतच झाली. खूप जोराचा पाऊस पडत होता. त्यामुळे फौजदार वेळेवर पोहोचले नाहीत. सुटकेची अचानक संधी आली होती. ब्रिटिश हद्दीत ही मंडळी पळून गेली आणि स्वातंत्र्य मिळेपर्यंत संस्थानात आलीच नाही. डॉ. कसरेकरांना पळून जाणे शक्य झाले नाही. ते जामखेड या नगर जिल्ह्यातल्या तालुक्याच्या गावी सरळ बसमध्ये बसले आणि त्यांनी नगरचे तिकीट काढले. जामखेडहून नगरला बस जाताना आष्टी हा निजामी हद्दीतील बीडचा तालुका येतो. तेथे बस थांबली तेव्हा निजामी पोलिसांनी डॉक्टरांना बसमधून उतरवून घेतले आणि पुन्हा तुरुंगात पाठवले. काका अशा पाक्षिक अटकेत नव्हते. त्यांचा स्थानबद्धतेचा हुकूम हैदराबाद सरकारने काढलेला होता. त्यांची अशी तात्पुरती सुटका आणि अटक होत नसे.

काका बीडच्या तुरुंगात असताना सत्याग्रह केलेली काही तरुण मुले तेथे आणण्यात आली होती. एकदा महालक्ष्मीचा सण होता. काका बीड तुरुंगात होते. पुरणपोळी पाठवाल तर माझ्या एकट्यासाठी नको, तुरुंगात माझ्याबरोबर असलेल्या तीस-चाळीस सत्याग्रही मुलांना ती मिळाली पाहिजे, असा काकांनी निरोप पाठवला. आईने पंधरा- वीस पुरणपोळ्या पाठवल्या. प्रत्येक सत्याग्रही मुलाला अर्धीअर्धी पोळी मिळाली. पुढे बीड तुरुंगातून औरंगाबादला हलवायचे ठरले तेव्हा आजी त्यांना भेटायला गेल्या. मी आणि आईही बरोबर होतो. बाईने अगदीच छोटे बुटकुले भरून तूप नेले होते. भेट संपताना बाईने काकांना ते पिण्याचा आग्रह केला. तुरुंगाधिकाऱ्याच्या परवानगीशवाय बाहेरचे अन्न घेता येत नव्हते. अधिकारी समोरच बसले होते. त्यांनीही काकांना ते तूप पिण्याचा आग्रह केला आणि काकांनी आपल्या आईच्या समाधानासाठी ते घेतले. औरंगाबादच्या हर्सूल तुरुंगात काका असताना बाबा मला आणि आईला निदान दोन-तीन वेळा तरी भेटावयास घेऊन गेले होते. चळवळीचे एक ज्येष्ठ नेते आ.कृ. वाघमारे यांच्या पत्नी आशाताई वाघमारे तुरुंगातील सत्याग्रही किंवा स्थानबद्धच्या भेटीसाठीची परवानगी मिळण्यासाठी मदत करीत. तुरुंगाच्या बाहेर जेवढी तुरुंगाबद्दल भीती होती तसे वातावरण तुरुंगात दिसत नसे. औरंगाबादच्या हर्सूल तुरुंगात तर त्या वेळी हजारापेक्षा जास्त सत्याग्रही होते. मोठ्या दरवाज्यातून आत गेले की दर्शनी भागातच काही वेळा घरी येऊन गेलेली परिचयाची माणसे दिसत. काका एका मोठ्या बराकीत येरझारा घालताना दिसत. चालण्याचा भरपूर व्यायाम त्यांनी आयुष्यभर केला. त्यांच्या दीर्घायुष्याला तो उपयोगी पडलेला असणार. तुरुंगात मागवलेच तर काका फक्त शेंगदाणे मागवत. शेंगदाणे काकांना तर आवडतच, शिवाय तो टिकणारा आणि सहज वाटता येऊ शकणारा खाऊ असे. काका मुलांना अनेक गोष्टी सांगत, वर्तमानपत्र वाचवून दाखवीत आणि त्यातील घडामोडीवर भाष्यही करीत. कधी एखादे पुस्तक वाचून दाखवत. काकांवर तरुण सत्याग्रही नेहमी खूश असत.

काँग्रेसवर बंदी असताना महाराष्ट्र परिषद नावाने तेच काम केले जाई. अगदीच कमी वेतनावर काही पूर्णवेळ कार्यकर्ते परिषदेचे काम करीत. त्या त्या भागातील प्रमुख कार्यकर्त्यांकडेच अनेकदा त्यांचे जेवण होई. अशा कार्यकर्त्यांपैकी अंबाजोगाईचे भिकाभाऊ राखे बरेच दिवस आमच्या घरी राहत असत. माझी बहीण उषा तेव्हा दोन-तीन वर्षांची होती. तिला भिकाभाऊ हे पूर्ण नाव उच्चारणे अवघड जात होते त्यामुळे ती त्यांना भिकारीमामा म्हणे.

त्या काळी फारशी खेळणी अस्तित्वात नव्हती. जी असतील तीही विकत घेण्यासाठी आमच्याजवळ पैसेही नव्हते. काका लाड करायचे म्हणजे खडूचा अख्खा डबा आणून द्यायचे. पाटी-पेन्सिलीपेक्षा माझे प्रारंभीचे अक्षरधडे मी खडूनेच जास्त गिरविले. गावात रॉयल टॉकीज या नावाचे एकमेव थिएटर होते. सरदारखाँ या श्रीमंत कंत्राटदाराच्या ते मालकीचे

होते. या टॉकीजमध्ये लागणाऱ्या चित्रपटांची जाहिरात म्हणजे दोन कापडी बोर्ड एकमेकांना तिरपे जोडून त्याला खाली चाके बसवून त्याची ढकलगाडी केली जात असे. ही ढकलगाडी गावात दुपारी चारपाचच्या सुमाराला सर्व प्रमुख रस्त्यावरून जाई. या जाहिरातफळ्यांच्या पुढे बॅगपाईप वाजवणारा एक माणूस, बिगूल वाजवणारा एक माणूस आणि ड्रम वाजवणारा एक जण असे तिघांचे बँडपथक असे. बँडचा आवाज दुरून येऊ लागला की मी धावत मोठ्या दरवाजासमोर येऊन उभा राहत असे. बँडवादन मधे मधे थांबवून त्यांतलाच एक जण चित्रपटाची जाहिरात एका कर्ण्यातून उर्दूमिश्रित मराठीत करीत असे. ती होईपर्यंत पाट्यांची ढकलगाडी एका जागी थोडा वेळ थांबे. या वेळेत पोस्टरवरची अक्षरे आणि कापडी फळ्यावर रंगवलेली अक्षरे मी लक्षात ठेवी. तशीच अक्षरे स्मरणाने मोठ्या दरवाज्यावर नंतर ओट्यासमोर दादांच्या बैठकीला एक लाकडी पार्टिशनवजा भिंत होती त्यावर मी काढी. नंतर तीच अक्षरे पाहून मग आतल्या दरवाज्यावर काढत असे. याच पद्धतीने सिनेमाचे नाव वाडाभर उमटे. मी काढलेले अक्षर काय आहे हे मलाच माहीत नसे. मग कोणाला तरी विचारावयाचे आणि मग ते अक्षर लक्षात ठेवावयचे; याच पद्धतीने माझी मराठी व इंग्रजी मुळाक्षरांची ओळख झाली. सिनेमा पाहण्याचा योग मात्र फारच क्वचित येई.

बीडमध्ये गणेशोत्सव साजरा होई पण त्याला उत्सव म्हणता येणार नाही इतक्या गंभीर वातावरणात तो होई. ध्वनिवर्धके, रोषणाई इत्यादी गोष्टी तर अस्तित्वात आल्याच नव्हत्या; परंतु इतर कार्यक्रमावरसुद्धा काहीसे भीतीचे सावट असे. कोणत्याही निमित्ताने सरकार अगर त्याचा पाठिंबा असलेले गुंड काहीही विघ्न उपस्थित करू शकत. गावात तीन-चार मेळे होते व त्यांचे कार्यक्रम देवळात अगर एखाद्या मोठ्या व्यक्तीच्या अंगणात होत. रस्त्यावर, चौकात किंवा मोकळ्या मैदानात मेळ्याचे कार्यक्रम अशक्यच होते. अनंतचतुदर्शीला गणपतीचे विसर्जन झाल्यावर दुसऱ्या दिवशी मेळ्यांची स्पर्धा काशीरावांच्या धर्मशाळेत होई व सर्वोत्कृष्ट मेळ्याला एखादे चांदीचे पदक देण्यात येई. मेळ्यातील पदांना राजकारणाचा वास येऊ नये याची काळजी घेतली जाई; पण तरीही साध्या गोष्टींनाही तत्कालीन वातावरणाचा संदर्भ सहज येई. अशी गाणी म्हणताना किंवा ऐकताना मन थरारून जाई. एक गाणे माझ्या अजून लक्षात आहे.

तो शूरपणा आता तरुणात कसा नाही?
इतिहास मराठ्यांचा स्मरणात कसा नाही ?

या गाण्यात खरे म्हणजे निजामाच्याविरुद्ध काही नव्हते. पण हे गाणे जाहीर कार्यक्रमात म्हणताना आणि नुसते ऐकतानाही आपण काही तरी बंडखोरीचे कृत्य करीत आहोत असे मनाला वाटून जाई. गणपती विसर्जनाच्या मिरवणुकीला सरकारी परवानगी लागे. मिरवणुकीतील सर्वांनी सरकारने घातलेल्या अटी पाळाव्या याची जबाबदारी परवानगी मागणारावर असे. मिरवणुकीत सरकारला अमान्य होऊ शकणारी घोषणा देऊ नये, मशिदीसमोर वाद्ये वाजविली जाऊ नयेत असे अनेक निर्बंध पाळावे लागत. शिवाय ऐनवेळी एखाद्या माणसाने काही कुरापत काढली तर त्याची दादा-बाबा करून समजूत काढावी लागे. दत्तमंदिरातील गणपती मानाचा समजला जाई व तो मिरवणुकीच्या शेवटी असे. किशनराव देसाईंचा या मिरवणुकीत पुढाकार असे. देसाई प्रत्यक्ष राजकीय काम करीत नसले तरी हिंदू सभेचे म्हणून ओळखले जात.

मुक्ताबाईची पालखी हा गावासाठी महत्त्वाचा असलेला एक सार्वजनिक उत्सव. एदलाबादहून पंढरपूरकडे जाताना बीडला ज्येष्ठ वद्य एकादशीला पालखी मुक्कामाला येई. तिच्या प्रवासाचा कार्यक्रम ठरलेला असे. आल्यादिवशी संध्याकाळी माळीवेस मारुतीच्या देवळात पालखी थांबे. बळवंतरावदादांच्या वडलांनी या देवळात वीस-पंचवीस खण बसवून दिले होते. त्या प्रशस्त जागेत दुपारी पंडितबुवा पुराणिक पुराण सांगत; तिथेच पालखीचा मुक्काम असे. पालखी आली म्हणजे पानफुले विकणारे देवळासमोर बसत. गावात फारशी फुलेच नव्हती; होती ती गुलमोहराची. संध्याकाळी पालखी आली व देवळात टेकली म्हणजे फारशी गर्दी नसे. त्या वेळी एकदा दर्शन घेतले म्हणजे दुसऱ्या दिवशी गर्दीत घुसण्याची गरज राहत नसे. पालखीबरोबर आलेले वारकरी कुणाकुणाच्या घरी रात्रीच्या जेवणाला असत. दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ-दहा वाजता पालखी देवळातून बाहेर येई आणि तिचा परतीचा प्रवास सुरू होई. हळूहळू लोकांची गर्दी वाढत जाई. आमच्या वाड्याजवळ येईपर्यंत तर रस्त्यात पाय ठेवायलाही जागा नसे. आनसाकाकी-आबांच्या पत्नी-वाड्यामागच्या गल्लीतून जाऊन रावसाहेबांपासून चालत आलेल्या प्रथेप्रमाणे पालखीची ओटी भरत.

पालखीच्यासमोर गावातले सर्व वाजंत्री, बँडवाले वाजवत गावाच्या वेशीपर्यंत तिला पोहोचवीत. बीडला बँड वाजवणारांत हिंदू आणि मुसलमान दोन्ही होते. बहुधा मुस्लिम पिंजारी आणि हिंदू न्हावी बँड वादनाचा साहाय्यक व्यवसाय करीत. पालखीसमोरची ही सर्वांची हजेरी विनामूल्य असे. कोणी कोणत्या बँड पथकात पुढील वर्षभर राहयचे हे पालखीच्या दिवशीच ठरे व पथकाचे नवे वर्ष त्यादिवशीपासूनच सुरू होई. धांडेगल्लीतल्या व्यायामशाळेतली मुले बैलगाडीवर बांधलेल्या मल्लखांबावर कसरती करीत. एक-दोन लेझीमची पथकेही असत. पालखीच्या किंवा गणपतीच्या मिरवणुकीचा फारच थोडा भाग गच्चीवरून दिसे. वाड्याच्या मोठ्या भिंतीलगत रस्त्यावर दोन बाजूंनी दुकाने झाली होती त्यामुळे मिरवणूक पाहायला रस्त्यावर जावे लागे. गावाच्या सीमेवर खासबागेतील देवी होती. तिथपर्यंत पालखीला वाटी लावले की गावकरी परतू लागत.

# ३

निजामी राजवटीच्या सांस्कृतिक आक्रमणाला थोडासा बांध घालण्यासाठी संस्थानात काही खासगी शाळा स्थापन झाल्या. अशाच शाळांपैकी १९४२ साली सुरू झालेल्या बीडच्या चंपावती विद्यालयात माझे प्राथमिक शिक्षण झाले. शाळेला सरकारी मदत नव्हतीच. काकांचे एक वर्गमित्र नारायणराव महाशय हे मुख्याध्यापक म्हणून काम पाहत होते. कबाडगल्लीतल्या नामलगावकरांच्या वाड्यात पहिली-दुसरीचे तर शेजारी रस्त्यापलीकडे असलेल्या हिरामणसिंगांच्या इमारतीत तिसरी-चौथीचे वर्ग भरत. चौथीपर्यंत माध्यम मराठीच होते. चंपावती शाळेतच वक्तृत्वाचे प्राथमिक धडे मी घेतले. एकनाथराव पवार नावाचे माझे एक उत्साही शिक्षक अधूनमधून मुलांना एखादा विषय देऊन भाषण करावयास सांगत. का कुणास ठाऊक, लहानपणी मला अशी खोड होती की उभा राहून मी लोकांसमोर बोलू लागलो की हात पाठीमागे घेऊन बोटांच्या पेऱ्यावर मी मोजणे सुरू करी. बोलण्यातल्या विषयाचा आणि त्या मोजण्याचा काही संबंध नसे. पण ही क्रिया आपोआप घडे. पवार गुरुजींनी एक-दोन वेळा मागे उभे राहून मोजणारे माझे हात तसेच धरून ठेवले व मला भाषण चालू ठेवण्यास लावले. असे दोन-तीन वेळा त्यांनी केले आणि माझी ती सवय सुटली. चंपावती शाळेत बहुतेक सर्व शिक्षक हिंदू होते. चंपावती शाळेविषयी आत्मीयता एवढी की काही शिक्षक तर विनावेतनच शिकवीत. गोपाळराव देशपांडे आम्हांला इंग्रजी शिकवीत. तेही विनावेतनच होते. मी शाळा सोडली त्याच वेळी गोपाळराव पुढील शिक्षण चालू ठेवण्यासाठी राजीनामा देऊन गेले. एक मौलवीसाहेब अगदी शेवटी शिक्षकवर्गात सामील झाले. स्वभावाने गरीब असलेला हा माणूस उत्तर प्रदेशातून हैदराबादेत येऊन स्थायिक झालेल्या कुटुंबांपैकी होता. ते उर्दू शिकवीत. तिसरीपासून असणारी दुसरी भाषा म्हणून उर्दू शिकणे आवश्यक होते. पाचवीचा वर्ग आमच्या शाळेत नसल्यामुळे चौथी पास झाल्यावर मी सरकारी हायस्कुलात-मदरसे फोकानियात प्रवेश घेतला.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हैदराबादचा लढा आणखीच तीव्र झाला. स्टेट काँग्रेसच्या अनेक प्रमुख कार्यकर्त्यांना संस्थानातील वेगवेगळ्या तुरुंगात स्थानबद्ध करण्यात आले. काकांना औरंगाबादच्या हर्सूल तुरुंगात ठेवले होते. माझे चुलते-बाबा दोनतीन वेळा काकांना भेटायला मला आणि आईला घेऊन गेल होते. राधाकाकींचे भाऊ राजामामा तांदुळवाडीकर औरंगाबादला अप्पा हलवायाच्या दुकानाजवळ राहत. त्यांच्या घरी आम्ही उतरत असू. औरंगाबादला तेव्हा त्या भागातल्या बहुतेक घरांत खूप ओल असे. आशाताई वाघमारे तेव्हा सुटून आल्या होत्या. त्या काकांची भेट मिळवून द्यायला मदत करीत.

काकांची स्थानबद्धता किती काळ चालणार याचा काहीच अंदाज नव्हता. त्यांच्या सुटकेची वाट पाहत काळजी करीत राहण्यामुळे आई आणि आजीचे दिवस सारखे मोठे होत होते. त्याच काळात माझ्या मामांची तब्येत बरी नसल्याचा निरोप आला. मामांना बऱ्याच काळापासून क्षयाचे दुखणे होते. उपचारासाठी त्यांना मागे एकदा कोरड्या हवेच्या ठिकाणी शुश्रूषागृहात ठेवण्यात आले होते. आता ते नाशकातच विश्रांती घेत होते. नाशिकला काही दिवस जाऊन राहावे असे आईने ठरवले. बाबांनी आईला व मला नाशिकला पोहोचवले.

आई-वडील लवकरच गेल्यानंतर मामांनीच माझ्या आईला सांभाळले व शिकवले. मामा चांद्याला (आताचे चंद्रपूर) वनखात्यात नोकरी करीत. त्यांची घरची स्थिती फार चांगली नसली तरी बरी होती. नागपूरला आत्याकडे असताना आई सातवी उत्तीर्ण झाली होती. आठवीचे शिक्षण चालू असतानाच तिला चांद्याला मामांनी बोलावून घेतले होते. चांद्याला तेव्हा मुलींची वेगळी शाळा नव्हती. तेथील हायस्कुलात मुले आणि मुली एकत्रच शिक्षण घेत. मामांना हे सहशिक्षण पसंत नव्हते म्हणून त्यांनी आईला शाळेत जाऊ दिले नाही आणि तिची शाळा सुटली. एका जवळच्या नातेवाइकांनी काकांचे स्थळ मामांना सुचवले. मामा बीडला आले आणि मुलाला पाहून परत गेले आणि हे लग्न झाले.

मामांची वनखात्यातील नोकरी संपुष्टात आली आणि त्यांना वेगवेगळ्या नोकऱ्या कराव्या लागल्या. नाशिकला गोठी शेठजींच्या नोकरीत मामा आले आणि त्यांच्या फाउंड्रीपासून डेअरीपर्यंत अनेक उद्योगांत मामांनी काम केले. नाशिकला आम्ही गेलो म्हणजे मामांकडे महिना-दोन महिने मुक्काम असायचा. त्र्यंबक रोडवरच्या पोलिस ट्रेनिंग स्कूलसमोर गोठींच्या डेअरीचे व्यवस्थापक असताना तेथील एका बंगल्यात मामा राहत होते. भोवताली खूप मोठी मोकळी जागा असलेले हे मामांचे घर मला विशेष आवडे.

मामा आता भद्रकालीच्या देवळाजवळ पारसनाथ लेनमध्ये गर्गेंच्या स्टुडिओमागे एका घरात राहत होते. मामा खूपच अशक्त झाले होते. गोठीशेठजींच्या नोकरीत ते आता नसावेत. दिवसातून एखादी फेरी ते गावात मारून येत; पण बाकी वेळ घरीच असत. डॉ. केळकर त्यांना कसलीतरी इंजेक्शने अधूनमधून घरी येऊन देत असत. नाशिकला आल्यावर माझे वर्ष जाऊ नये म्हणून मामांनी मला पेठे हायस्कूलमध्ये प्रवेश दिला. बीडला माझे माध्यम उर्दू होते आणि अभ्यासक्रमही नाशिकपेक्षा वेगळा होता. तरीही पेठे हायस्कूलच्या शिक्षकांनी माझ्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करून मला परीक्षेस बसवले. पेठे हायस्कूलची रविवार कारंज्याजवळची इमारत नुकतीच तयार झाली होती. त्याच इमारतीत दुपारी आमची शाळा तर सकाळी सिंधी निर्वासितांसाठीची सिंधी शाळा भरे.

मामा-मामींना एकच मुलगी. ती माझ्यापेक्षा वयाने बरीच वडील. शकुताईला मी अक्का म्हणे. तेव्हा ती मॅट्रिकच्या वर्गात होती. ती ही माझे लाड करी. गावाबाहेर असलेल्या

तिच्या शाळेत तिने मला टांग्यातून एक-दोन वेळा नेले होते. एके दिवशी सकाळी मामींनी वरणफळे केली होती. सकाळच्या जेवणात सगळ्यांनी खाऊनही संध्याकाळी थोडी शिल्लक होती. अक्काची शाळा माझ्याअगोदर सुटे. घरी आल्यावर तिने उरलेली वरणफळे खाऊन टाकली. मी खेळून परत आल्यावर पाहिले तर फळे शिल्लक नाहीत. मला न देता मुद्दाम ती अक्काला दिली असा मामीवर आरोप करणारे मी काही तरी बेजबाबदार बोललो. माझे बोलणे ऐकून मामा खूपच व्यथित झाले. आईने मला त्यांची माफी मागायला लावली. मला जवळ घेऊन मामा स्वत:च रडू लागले. मामांना काय वेदना झाल्या असतील हे कळण्याचे तेव्हा माझे वय नव्हते. पण मामांच्या डोळ्यातले ते अश्रू आणि त्याला कारण झालेले माझे बोलणे आजही अस्वस्थ करते.

मामांकडे एक छोटी अलमारी भरून पुस्तकांचा साठा होता. अभ्यासाकडे दुर्लक्ष होऊ नये म्हणून मामा मला अवांतर वाचन करू देत नसत. ते बाहेर गेल्यानंतर हळूच त्या कपाटातील पुस्तके काढून वाचावी लागत. मामा येण्याच्या आत पुस्तक जागच्याजागी ठेवून द्यावे लागे. त्या साठ्यापैकी 'रायाक्लब ऊर्फ सोनेरी टोळी' आणि 'वीरधवल' या तेथे वाचलेल्या नाथमाधवांच्या दोन पुस्तकांनी मला अक्षरश: भारून टाकले. या दोन्ही पुस्तकांची हप्त्या हप्त्याने दोन-तीन पारायणे मी केली असावीत.

संध्याकाळच्या वेळी आमच्या घराजवळ चांदवडकर लेनमध्ये भरणाऱ्या राष्ट्र सेवादलाच्या शाखेवर मी जाऊ लागलो. या शाखेवर खेळत असतानाच एके दिवशी संध्याकाळी गांधीजींवर कोणी तरी गोळ्या झाडल्याची बातमी रेडिओवर आल्याचे आम्हाला सांगण्यात आले. शाखा लगेच सोडून देण्यात आली व मी धावत घरी जाऊन मामांना ही बातमी सांगितली. मामांची प्रतिक्रिया मला धक्का देणारी होती. गांधींच्या खुनाने मामांना दु:ख झाल्याचे दिसलेच नाही. कॉंग्रेस कार्यकर्त्याच्या घरात मी जन्मलो होतो. साहजिकच महात्मा गांधींच्याविषयी मनात पूज्य भाव होता. परंतु मामांची प्रतिक्रिया गांधीजी गेले हे बरे झाले, असे ध्वनित करणारी होती. मामांची प्रतिक्रिया ऐकून मी खूपच रागावलो. मला बोलता आले नाही; पण माझे डोळे भरून आले आणि मामांशी अजिबात न बोलता मी बाहेरच्या खोलीत खिडकीत जाऊन बसलो. मन अस्वस्थ आणि उदास झाले होते. मामा राहत त्या घराच्या भिंती चांगल्याच जाडजूड होत्या. खिडकीला गज होते आणि तिच्या आत सहज बसता येईल एवढी जागाही होती. आम्ही नाशिकला असतानाच माझी चुलतबहीण सिंधू वारल्याचे पत्र आल्यानंतर मी दोन-तीन दिवस असाच काही वेळ खिडकीत बसून राहत असे. सिंधू आणि मी साधारण समवयस्क होतो. तिच्या जाण्याचे दु:ख आई, मामा किंवा मामी यांपैकी कोणाशीच वाटून घेण्यासारखे नव्हते.

दुसऱ्या दिवशी सकाळी एक मूक मिरवणूक निघाली. त्यांत आम्ही मुलेही होतो. काही वेळाने नाशिकभर काही ब्राह्मणांच्या विशेषत: हिंदुत्ववाद्यांच्या- घराची आणि व्यावसायिक संस्थांची जाळपोळ सुरू झाली. हा क्रम दोन दिवस चालू होता. जमावाच्या झुंडीच्या झुंडी रस्त्यात फिरत होत्या. मामा आणि मी दोघेही बाहेर काय चालले आहे हे पाहण्यासाठी बाहेर पडलो असताना मामांच्या डोक्यावरची काळी टोपी पाहून मामांना काही लोकांनी घेरले आणि त्यांची टोपी काढायला लावली. आम्ही घरी परत आलो आणि थोड्याच वेळात संचारबंदी जाहीर करण्यात आली. पोलिसांनी गस्त सुरू केली. अतिरिक्त मद्यपान केलेल्या काही गुंडांना पोलिस पकडून घेऊन जाताना त्यातला एखादा महात्मा गांधी की जय असे ओरडे. तीन-चार दिवसांनी शाळेत गेलो पण उदासपण काही संपले नाही. आठ दिवसांनंतर शाळेच्या काच लावलेल्या सूचनाफलकात गांधींच्या शवावरची एक-दोन फुले आणून लावलेली होती. आम्ही त्यालाच श्रद्धेने नमस्कार करीत होतो. मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांच्या हस्ते रामकुंडात गांधीजींच्या रक्षेचे विसर्जन झाले. अवघे नाशिक त्या वेळी गोदावरीच्या दुतर्फा उभे होते.

एप्रिलमध्ये माझी वेगळी परीक्षा घेऊन शाळेने मला उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र दिले. आईने आता बीडला परत जाण्याचे ठरवले. संस्थानातील अशान्त वातावरणामुळे अजून अनेक लोक बाहेर येत होते. आम्ही मात्र पुन: संस्थानात जाण्याचे ठरवत होतो. काका तर तुरुंगातच असणार होते, त्यांना वगळून सुरक्षिततेचा वेगळा विचार आई करू शकत नव्हती. औरंगाबादचा तुरुंग इतरांच्या तुलनेने बरा असला तरी इतर काही तुरुंगात अधिकाऱ्यांनीच गुंडांना तुरुंगात प्रवेश देऊन सत्याग्रहींना मारहाण करावयास लावली होती. अनेक खेड्यात व यात्रेत हल्ले झाले होते. चीजवस्तूंची लूटही झाली होती.

## ४

अठ्ठेचाळीसच्या मे महिन्यात बाबा नाशिकला आले आणि आईला व मला परत घेऊन गेले. औरंगाबादच्या स्टेशनवर उतरल्यावर टांगा अगोदर स्टेशनसमोरच असलेल्या करोडगिरीच्या कार्यालयात गेला. संस्थानात बाहेरून येणाऱ्या मालावर निजामाने बसवलेली जकात म्हणजे करोडगिरी. आमची बॅग आणि वळकटी, पिशवी वगैरे सामान तपासले गेले आणि नंतर बसस्टॅंड गाठून आम्ही बीडला पोहोचलो.

बीडला आल्यावर मी सरकारी हायस्कुलात पुन्हा प्रवेश घेतला. याच शाळेतून पाचवीत असताना मी नाशिकला गेलो होतो. तेथे पाचवीऐवजी मला सहावीत बसवण्यात आले होते. नाशिकला सहावी पास झालो तरी ती पाचवीच समजून मला

बीडला सहावीतच प्रवेश मिळाला. माध्यम उर्दू. सर्व विषयांच्या पुस्तकांवर मुखपृष्ठावर मीर उस्मानअली खान या त्या वेळच्या निजामाचे चित्र छापलेले असे. माझ्या शेजारी मोरेश्वर नावाचा एक मुलगा बसत असे. एके दिवशी मोरूने माझे पुस्तक हातात घेऊन त्यावर निजामाच्या चित्रातील मूळच्या मिशा बदलून आक्कडबाज मिश्या काढल्या आणि नंतर पुस्तक हळूच माझ्याजवळ ठेवून दिले. आम्हांला उर्दू शिकवायला एक मुस्लिम शिक्षक होते. अर्धांगवायूने त्यांचा उजवा हात निकामी झाला होता. त्यांना त्यांच्या अपरोक्ष तुंडे मास्तर म्हणूनच आम्ही संबोधत होतो. ते मारकुटे म्हणूनही प्रसिद्ध होते. त्यांचे लक्ष त्या पुस्तकाकडे गेले आणि त्यांनी कोणतेही स्पष्टीकरण न विचारता डाव्या हाताने मला झोडपण्यास सुरुवात केली. ती खोडी मी केलेली नाही हे मला सांगण्यालाही सवड मिळाली नाही. मी मार खात असताना मोरू मात्र साळसूद चेहरा करून आपले पुस्तक वाचण्याचा बहाणा करत होता. वर्गात हिंदू मुलांची संख्या अधिक असली तरी मुस्लिम मुलांची दादागिरी जास्त होती. एका चपराश्याचा मुलगा आमच्या वर्गात होता. कारण नसताना वर्गातल्या प्रत्येक मुलाला त्रास देणे, धक्काबुक्की करणे यात त्याला आनंद होई. पुढे पोलिस ॲक्शन झाल्यानंतर शाळा जेव्हा प्रथम भरली तेव्हा सर्व वर्गाने मिळून त्याची धुलाई केली.

हैदराबाद संस्थानची नाकेबंदी केली गेली असल्यामुळे पेट्रोल, डिझेल, रॉकेल मिळणे दुरापास्त झाले होते. खासगी बसेसना डिझेलअभावी कोळशाचे बंब पाठीमागे लावून कोलगॅसवर त्या चालवल्या जात होत्या. बसच्या मागचा भाग इतका तापे की तेथे बसणे अशक्य होई. रॉकेल हेच दिवाबत्तीचे एकमेव इंधन होते. तेच मिळेना. आठ पंधरा दिवसांनी थोडेसे रॉकेल येई आणि पोलिसचौकीसारख्या ठिकाणी लोकांना ते वाटण्यात येई. एकदा माळीवेस पोलिस चौकीत मी रांगेत उभे राहून सुमारे पाव लिटर रॉकेल मिळवू शकलो. गर्दीतून एका पोलिसाने अक्षरश: उचलून मला बाहेर आणून सोडल्यामुळे ते रॉकेल घरापर्यंत पोहोचू शकले.

हिंदू लोक अगदीच आवश्यक असेल तरच घराबाहेर पडत अशा तणावाच्या काळातही बाबा बऱ्याच धैर्याने अशा सभांना जात; तेही काही वेळा मला बरोबर घेत. संस्थानातील परिस्थिती कशी वळण घेते आहे याचा थोडाफार अंदाज अशा सभांत येऊ शकत असावा. भारत सरकार कोणती उपाययोजना करणार आहे हे जाणून घेण्यासाठी मात्र एकच साधन उपलब्ध होते ते म्हणजे ऑल इंडिया रेडिओवरील बातम्या. वृत्तपत्रे येतच नव्हती. गावात रेडिओही दोन-तीनच होते. निजामाच्या रेडिओ दख्खनची हैदराबाद व औरंगाबादेत केंद्रे असली तरी त्यावरच्या बातम्या एकांगी व अविश्वसनीय असत म्हणून दिल्लीच्या बातम्या ऐकणे आवश्यक असे.

बाबा प्रत्यक्ष राजकारणात नसले तरी राजकीय घडामोडींचा सतत वेध घेत असत. परिस्थितीनेच त्यांना थोडेफार निर्भय केले असावे. सरहद्दीवर काँग्रेसने कार्यकर्त्यांची शिबिरे चालू केली होती. त्यातील कार्यकर्ते संस्थानच्या हद्दीत येऊन जवळच्या करोडगिरी नाके, पोलिस चौक्या यावर हल्ले करत. त्यांना मार्गाचे नकाशे हवे असत. बाबा तहसीलमधले नकाशे घरी आणत व रात्री त्यावर पातळकागद ठेऊन आवश्यक भागाचे नकाशे ट्रेस करत. पुढे ते नकाशे विठ्ठल बाब्रस किंवा कोणी डोमरीसारख्या ब्रिटिश हद्दीतील जवळच्या गावात कार्यकर्त्यांना पोहोचते करीत.

बाबा रोज रात्री बातम्या ऐकण्यासाठी भिक्कमसिंगांच्या घरी बुंदेलपुऱ्यात जात. बरोबर बहुधा आमच्या वाड्यातले भाडेकरू आबा बाब्रस असत. कधी कधी बाबा मलाही बरोबर नेत. आबा बाब्रस पोलिस खात्यात कॉन्स्टेबल होते. शिक्षण फारसे झालेले नव्हते. एकदा बातम्यांत 'जाहगीरदारी निजाम खतम किया जायगा' असे भारत सरकारचे आश्वासन सांगितले गेले. बाब्रसांनी घरी येऊन आजीला सांगितले की, निजामाला खतम करायचे ठरले आहे. उर्दूत निजाम म्हणजे व्यवस्था. जाहगीरदारी पद्धत नष्ट करू असे ते आश्वासन होते. हैदराबादच्या निजामाबद्दलचा तो निर्णय नव्हता.

आम्ही बीडला आल्यानंतर महिन्या-दीडमहिन्यानेच मामा वारल्याचे कळवणारे पत्र आले. आईचे माहेर संपले होते. ओसरीच्या बाहेर परसाच्या बोळीत आई किती तरी वेळ एकटीच रडत होती. आईचे लग्न झाल्यावर मामा-मामी एक-दोन वेळा बीडला आली, आई मात्र दर दोन-तीन वर्षांनी महिना पंधरा दिवसासाठी माहेरी जाई. दर भाऊबीजेला मामा आईला पाच रुपयांची ओवाळणी मनिऑर्डरने पाठवीत. मुर्शदपूर नावाचे बीडजवळच असलेले आणि चोहोबाजूंनी संस्थानी मुलखाने वेढलेले एक छोटे गाव ब्रिटिश हद्दीत होते. तेथे पोस्ट ऑफिस होते. संस्थानाबाहेरून बीडला येणारे सर्व टपाल मुर्शदपूरचा पोस्टमन बीडला येऊन वाटे. बीडचे बहुतेक पोस्टमन मुस्लिम व उर्दू बोलणारे असत. मराठी बोलणारा पोस्टमन फक्त मुर्शदपूरहूनच येई. मामाची मनिऑर्डर घेऊन तो आला म्हणजे त्याला थांबवून आई चहा करून देई.

सप्टेंबर महिन्यात वातावरण आणखी तंग झाले. भारतीय सैन्य लवकरच संस्थानात घुसणार अशा बातम्या येत होत्या. संघर्षात काय घडणार ही धास्तीही होती. तणाव आणखी वाढला होता. भाजीमंडईतल्या गाळ्यात संस्थानाबाहेरून आलेले मुस्लिम निर्वासित राहत होते. भाजीविक्रेत्यांना बाहेर हाकलण्यात आले होते. रझाकारांची गावात संचलने होत होती. चळवळ सुरू झाल्यानंतर सरकारी नोकऱ्या सोडून द्या असे काँग्रेसने आवाहन केल्यामुळे चुलत्यांनी महसूल खात्यातील त्यांची नोकरी सोडून दिली होती आणि एक छोटेसे कटलरी-स्टेशनरीचे

दुकान धोंडापुरातच त्याच वर्षी सुरू केले होते. ते दुकानही तीन-चार दिवसांपासून बंदच होते. वाड्याचे मोठे दार दिवसासुद्धा बंद करण्यात येऊ लागले. शाळेत मी जात होतो पण शाळा सुटण्याची वेळ झाली म्हणजे वाड्याबाहेर बाबा आणि अंगणात आई वाट पहात बसलेले असत. भारतीय सैन्य संस्थानात शिरले तर ते गावात पोहोचण्यापूर्वीच सर्व हिंदूंची कत्तल केली जाणार आहे अशी एक अफवा पसरली होती. रझाकारांचे आणि इतेहादुल मुस्लमिनचे पुढारी जी बेजबाबदार आणि भडकवणारी भाषणे करीत होते त्यामुळे अशा अफवांना बळ मिळत होते. त्यांच्या चिथावणीमुळे काही गावात खरोखरच दंगली आणि जाळपोळ झाली होती. निरपराध माणसे मारली गेली होती. काही ठिकाणी स्त्रियांवर अत्याचारही झाले होते. राजुरीवेशीच्या बाहेर सय्यद अनिसुद्दीन या वकिलांनी हातात तलवार घेऊन केलेले एक भाषण मी बाबाबरोबर ऐकले होते. हेच अनिसुद्दीन पोलिस कारवाईनंतर हैदराबादला वकिली करू लागले, तेव्हा काकाबरोबर त्यांची भेट झाली. मात्र त्या वेळी त्यांचे रूप नम्र आणि स्नेहशील झाले होते. गुंडांची संख्या कमी असली तरी त्यांच्याजवळ शस्त्रे होती आणि त्यांच्या गुंडगिरीविरुद्ध सरकार नागरिकांचे रक्षण करणार नव्हते. त्यामुळे लोक घाबरलेले होते. आपल्या रक्षणासाठी काही करावे असे वाटले तरी फारसे काही करता येणार नव्हते. पण तरीही काहीना काही हालचाल करायलाच हवी होती. चुलत्यांच्या दुकानात काचेचा आणि चिनीमातीचा जो माल येई तो गवतात गुंडाळून येई. शिक्षणासाठी आमच्याकडे राहिलेल्या शेषेकाकांनी आता बाबांना दुकानात मदत करण्याला सुरुवात केली होती. या शेषेकाकांनी दुकानातले बरेचसे गवत घरी आणले आणि ते गच्चीवर नेऊन ठेवले होते. गुंड मोठा दरवाजा तोडून आत आलेच तर त्यांच्यावर गच्चीवरून ते गवत पेटवून अंगणात टाकावे अशी त्यांची अफलातून कल्पना होती. आमच्या माडीवर लाकडी गोलांच्या आधाराने एक पत्र्याचे छप्पर उभारण्यात आले होते. गच्चीवर झोपल्यावर पाऊस आला तर खाली येण्याची धावाधाव होऊ नये म्हणून तो आसरा उपयोगी येई. त्या छप्परावरील पत्रे उडू नयेत म्हणून त्यावर काही दगड ठेवले होते. तेही अशा कामाला येतील असा त्यांचा समज होता. आपल्या मनातल्या या कल्पनाचा व तयारीचा काही उपयोग नाही हे त्यांनाही कळत असले पाहिजे. अशा योजना मनातल्या मनात आखणे हा आपल्या मनातील भीती कमी करण्याचा एक उपाय होता.

१३ तारखेला आमच्या शाळेत एक सभा होणार होती. चुलत्याबरोबर- बाबाबरोबर मी येतो म्हणालो. म्हणून त्यांनी मलाही सभेला नेले. दोन दिवसांपूर्वी वारलेल्या जिनांच्या मृत्यूबद्दल शोक व्यक्त करण्यासाठीची ती सभा होती. अशा सभेला खरे म्हणजे खूप गर्दी असायची. परंतु खाली मांडलेली बाकेही पूर्ण भरलेली नव्हती. शाळेच्या व्हरांड्यात व्यासपीठ केले होते. आम्ही गेलो तेव्हा आमचे एक शिक्षक महबूबखाँ साहेब यांचे भाषण चालू होते. त्यांच्या हातात एक नकाशा होता आणि तो ते अधूनमधून दाखवत होते. फाळणी झालेल्या विभक्त भारताचा तो नकाशा होता. त्यात हैदराबाद संस्थानही स्वतंत्र दाखवले होते. महबूबखाँ हे अतिशय मृदू स्वभावाचे शिक्षक होते. शाळेतसुद्धा समारंभाच्या वेळी ते अतिशय शांतपणे बोलत. सभेत जमलेले लोक एकमेकांशी फारसे बोलत नव्हते. आम्ही उभेच होतो. सभेला हजर असलेल्या दीडदोनशे माणसांत कदाचित आम्ही दोघेच हिंदू असू. आमच्या जवळच उभ्या असलेल्या माणसाच्या जवळ एक लहान आकाराची बंदूक होती. ते काय आहे असे बाबांना मी विचारले, बाबांनी ती स्टेनगन आहे असे मला सांगितले. सभा संपण्यापूर्वीच आम्ही तिथून परत निघालो आणि घरी आलो.

शाळेत संध्याकाळी झालेल्या जिनांना श्रद्धांजली वाहणाऱ्या सभेनंतर दुसऱ्या दिवशी सकाळी मी शाळेत गेलो. नेहमीप्रमाणे

तावदे खालिके आलम यह रियासत रख्खे।
तुझको उस्माँ बसद इजलाल सलामत रख्खे।

अशी निजाम उस्मानअली खान यांना दीर्घायुरोग्य चिंतणारी प्रार्थना झाली आणि त्यानंतर आमचे हेडमास्तर जुल्फेकार अली यांनी एक छोटेसे भाषण केले. 'आपल्या राज्यावर हल्ला झाला आहे आणि आपले सैनिक शौर्याने त्याचा मुकाबला करीत आहेत, सावध रहा. विमानांचा आवाज ऐकू येऊ लागला तर घरात जा, बाहेर पडू नका.' असे काहीसे ते सांगत होते. त्यांच्या भाषणानंतर आम्ही वर्गात गेलो; पण वर्ग झालेच नाहीत. शिक्षकांनी पाच-दहा मिनिटे आपापल्या वर्गात काही थातुरमातुर बोलून वेळ काढला आणि मुलांना घरी जाण्यास सांगितले. नंतर कळाले की, भारताच्या फौजा हैदराबाद संस्थानात घुसल्या असून त्यांची आगेकूच चालू आहे. निजामाचे सैन्य भारतीय फौजेला कितपत प्रतिकार करीत आहेत याचा मात्र काहीच अंदाज येत नव्हता.

## ५

अनंतचतुर्दशीच्या दिवशी शाळांना गणेश विसर्जनासाठी दुपारी अर्धा दिवस सुटी असायची. या वर्षी तर संस्थानात साप्ताहिक सुटी असलेल्या शुक्रवारीच अनंत चतुर्दशी आली होती. पण मी अगोदरचे दोन दिवसही शाळेत गेलोच नव्हतो. शाळेकडे कुणाचे लक्षच लागणे शक्य नव्हते. चार-पाच दिवसांपासून राजुरी वेशीच्या बाहेर शाळेच्या जवळ रस्ता दुरुस्तीसाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूला आणून टाकलेल्या खडीच्या ढिगावर लोखंडी टोप्या घातलेले काही शस्त्रधारी पोलिस बसलेले दिसू लागले होते. शाळेच्या फाटकाच्या अलीकडे दत्तू आणि दिगंबर यांचे रस्त्यावर चालणारे चहाचे दुकान बंद झाले होते. वातावरणात अनिश्चितता आणि तणाव दोन्ही होते.

आमच्या घरी बाबांनी (चुलत्यांनी) अनंताचे व्रत घेतले होते. अनंतचतुर्दशीला बाबा अनंताची पूजा करीत. चौरंगावर

सत्यनारायणाप्रमाणे पूजा मांडून अनंताची (गाठलेल्या दोऱ्याची) पूजा करावयाची. सकाळपासून पूजा संपेपर्यंत बाबा उपवास करीत. पूजेनंतर तो अनंत मनगटावर बांधत. पूजा सांगायला आमचे उपाध्ये गोविंदाचार्य अण्णा येत. त्या वर्षी ते आलेच नाहीत. अण्णा जिल्हा कोषागारात नोकरी करीत. सुटी असूनही त्या दिवशी त्यांना कामावर बोलावण्यात आले होते. दोन-तीन तास चालणारी ती पूजा त्या दिवशी बाबांनी स्वत:च थोडक्यात आटोपून घेतली. आम्ही जेवणेही उरकून घेतली. गणपती विसर्जनाची मिरवणूक निघणे तर शक्यच नव्हते. काही आवाज ऐकू येऊ लागले. म्हणून मी गच्चीवर गेलो. मोठे फटाके उडविल्यासारखे आवाज येत होते. खाली जाऊन बाबांना विचारले तेव्हा त्यांनी ते बंदुकांचे आवाज आहेत असे सांगितले. भारत सरकारचे सैन्य आले असावे व युद्ध सुरू झाले असावे असा सर्वांनी अंदाज केला. पण ते आवाज फार तर पंधरा-वीस मिनिटे टिकले. त्यानंतर सर्व शांत झाले. गच्चीवरून पाहिले तर रस्ते सगळे निर्मनुष्य दिसत होते. काय चालले आहे, काय झाले आहे हे कळायला काही मार्ग नव्हता.

वाड्याच्या अंगणामध्ये एक लाकडी फलाट पडलेला असे. उन्हाळ्याचे दिवस असले म्हणजे आजी त्यावर अंगणातच झोपत असे. खोकल्याचा त्रास होऊ लागला तर आजी काही वेळा मला पाठ दाबायला सांगत असे. उन्हे उतरले होती अंगणात फलाटावर आजी आणि बाबा बोलत बसले होते. मी जवळच पायऱ्यावर बसलो होतो. सखारामपंत वाड्याच्या मागच्या दरवाजातून आले. सखारामपंत माझ्या चुलत चुलत्याकडे विद्यार्थी म्हणून शिकायला होते. शिक्षणानंतर ते पोलिसमध्ये भरती झाले. संस्थानातल्या सगळ्याच पोलिसांना रजा रद्द करून कामावर बोलावण्यात आले होते. परंतु सखारामपंत गेलेच नव्हते. ''शस्त्र द्या म्हणजे मी गावाबाहेर लढायला जातो,'' असे मी म्हणालो. ''पण शस्त्रेच नव्हती. नुसतेच काय लढणार. म्हणून मी कामावरच गेलो नाही.'' असे त्यांनी बाबांना सांगितले. ते प्रतिकाराच्या कामावर गेले नसले तरी तिकडे काय घडले याची चौकशी करून ते आले होते. बीडला सैनिक फारसे नव्हतेच. सशस्त्र पोलिसांच्या तुकडीने दहा-पाच मिनिटे प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. भारतीय सैन्याने तुम्ही हकनाक मरू नका असे त्यांना सांगितले. तेव्हा बहुतेक लोक शरण आले. मात्र आमच्याच घराच्या पलीकडे बोबडेश्वरगल्लीत राहणारा राक्षसभुवनकरांचा कल्याण हा मात्र आपण ज्याचे मीठ खातो त्या निझाम सरकारसाठी लढले पाहिजे या कल्पनेने शरण येण्यास नकार देऊ लागला तेव्हा त्याला सैन्याने टिपले आणि तो हकनाक बळी गेला.

रस्त्यावर काही ओरडा ऐकू येऊ लागला म्हणून गच्चीवर जाऊन मी पाहिले तेव्हा एक माणूस हातात स्टेनगन घेऊन नदीच्या दिशेने पळत चालला होता आणि पळतापळता 'दुश्मन आया है, मुकाबलेको चलो' असे ओरडत होता. त्याची पळण्याची दिशा मात्र त्याचा दुश्मन आला त्या दिशेच्या नेमकी उलट्या दिशेची होती. थोड्या वेळात आबा बाब्रसही आले. भारताची फौज आली आहे व ती गाव ताब्यात घेणार आहे असे त्यांनीही सांगितले. आजी उठून स्वयंपाकघरात गेली. तिने साखरेचा डबा आणला. सखारामपंत आणि आबा यांच्या हातावर थोडी थोडी साखर घातली आणि मधूनच आपल्या डोळ्यातले पाणी पदराने पुसले. आजीच्या अन् आईच्या लेखी आता काका म्हणजे माझे वडील तुरुंगातून सुटतील हा येऊ घातलेल्या स्वातंत्र्याचा अर्थ होता.

वाड्याचा मोठा दरवाजा बाबांनी उघडला. रस्त्यावर कुणीच नव्हते. दुकानेही बंद होती. एखादा हरताळ असावा तसे वातावरण होते. मोठ्या दरवाज्याच्या डावीकडे सोनाराच्या दुकानासमोर छोटासा दगडी ओटा होता. त्यावर बाबा थोडा वेळ टेकले. मी दरवाज्यातच उभा राहून बाहेर पाहत होतो. एवढ्यात 'निझाम मुर्दाबाद', 'भारत जिंदाबाद' अशा घोषणा देत आमच्या गल्लीतला महारुद्र आणि दहा-बारा अगदीच लहान लहान मुले आली. फारसा काही कामधंदा न करणारा आणि शिक्षणही न घेणारा महारुद्र आमच्या परिचयाचा होता. एक राजवट संपली आहे आणि दुसरी सत्ता आली आहे याची द्वाही महारुद्र आणि ती मुले गावात फिरवीत होती. निर्भय झाल्याचा, स्वातंत्र्याचा आनंद काय असतो हे त्या मुलांच्या आणि महारुद्रच्या चेहऱ्यावर दिसत होते. दरवाजे किलकिले करून, खिडक्या उघडून लोकांनी ही मिरवणूक पाहिली आणि एक जुलमी राजवट संपल्याची दखल घेतली.

थोड्या वेळाने एक रणगाडा आला आणि तो सरळ माळीवेशीकडे गेला. रणगाड्यावर एकच सैनिक बसलेला दिसत होता. अंताजीच्या मशिदीजवळ फुलाऱ्याच्या दुकानाच्या फळीवर दोन-तीन बागवान बसले होते. त्यांची ती नेहमीची गप्पा मारण्याची जागा होती. रणगाडा येताच अभावितपणे ते सर्व उभे राहिले आणि त्यांनी रणगाड्यावरील सैनिकाला सलाम केला. पहिल्याप्रथमच मी रणगाडा पाहत होतो. पण तो लगेच दृष्टिआड झाला. तीन-चार दिवसांपूर्वी जुन्या बाजाराच्या वेशीला असलेला जुना लाकडी दरवाजा बंद करावा म्हणजे भारताचे सैन्य तिकडे येऊ शकणार नाही अशी कल्पना काही लोकांनी केली होती. एक तर साठ-सत्तर वर्षांत कधीच न लावण्यात आलेला दरवाजा आपल्या जागेवरून हलायलाच तयार झाला नाही आणि जरी लागलाच असता तर रणगाड्याने अगदी सहज धक्का दिला असता तरी तो मोडून पडला असता.

नंतर कळाले की जालना रस्त्याने आलेल्या भारतीय सैनिकांना फारसा प्रतिकार झालाच नव्हता. रस्त्यात आडव्या आलेल्या आणि सांगूनही न ऐकलेल्या दोन-तीन जणांचा बळी घेतल्यानंतर सैन्याची तुकडी सरळ राजुरीवेशीजवळ आली. वेशीच्या बाहेर डाव्या हाताला कलेक्टरचे निवासस्थान होते.

त्याला बाहेर बोलावण्यात आले. समोर मारुतीचे देऊळ होते. त्या पाराजवळ कलेक्टर जब्बार आणि पोलिस अधिकाऱ्यांनी शरणगती पत्करली आणि आमच्या गावापुरते युद्ध संपले.

अंधार पडू लागला. रस्त्यावरची दिवाबत्ती करण्यासाठी आज कोणीच उपलब्ध नव्हते. थोड्या वेळाने काही गोषासाठी पडदे लावलेल्या बैलगाड्या आणि छकडे चौकाकडून आमच्या घरासमोरून पेठेकडे जाऊ लागले. वेगाने जाणाऱ्या या गाड्या-छकड्यात मुस्लिम स्त्री-पुरुष होते. काही घाबरलेली मंडळी गावात काय होईल या भीतीने जवळच्या खेड्याकडे पळ काढत होती. ज्यांनी भडकवणारी भाषणे केली होती ते चार-पाच दिवसांपूर्वीच हैदराबादकडे पळून गेले होते. इतर आता जवळपासच्या इतर गावांचा आश्रय घेऊ पाहत होते. बीडहून जवळा किंवा पिंपळनेरला जायला बैलगाडीला त्या वेळी चार-पाच रुपये म्हणजे फार झाले. परंतु त्या संध्याकाळी प्रत्येक गाडीवाल्याने दोनदोनशे रुपये घेतले.

थोडा अंधार अधिक झाला तेव्हा काही सैनिक गावात आले. बाजारातली कोणती दुकाने मुस्लिमांची आहेत याची चौकशी झाली. गावातल्या लोकांनी भोगले पुष्कळ होते. पण ज्यांनी त्यांना त्रास दिला होता त्यांची ही दुकाने नव्हती. लुटालूट करण्याची लोकांची प्रारंभी हिंमत आणि इच्छाही नव्हती. शेवटी काही सैनिकांनीच त्या दुकानांची कुलुपे तोडली, फळ्या उघडून दिल्या अन् मग रस्त्यातल्या बघ्या लोकांनी लूट करायला सुरुवात केली. औरादकरांच्या मालकीच्या दुकानात भाडेकरू मुस्लिमाचे एक कापडाचे दुकान होते. त्या दुकानाचे कापड बाहेर आले. आमच्या वाड्याच्या दक्षिणेकडे एक-दोन बुटाची दुकाने होती. ती फोडली गेली. रस्त्यावर चपला-बुटांचे जोड आले. असे करू नका, दुकाने फोडू नका असे सांगणारेही थोडे लोक होते. परंतु त्यांचे ऐकण्याच्या मन:स्थितीत नंतर कोणी राहिले नाही.

आमच्या वाड्याच्या मोठ्या दरवाज्याच्या अगदी समोर बाबासाहेबांचे एक मोठे दुकान होते. बाबासाहेबांचे वडील मुस्लिम असले तरी बाबासाहेब मराठी बोलत. औरंगाबाद नभोवाणी केंद्रावर त्यांची मराठी गाणीही होत. त्यांच्या दुकानात गल्लीतली काही मंडळी गप्पा मारायलाही बसत. त्या दुकानात फार किमती नसला तरी गावाच्या मानाने बराचसा फॅन्सी माल होता. वासाची तेले, साबण, कंगवे अशा बऱ्याच गोष्टी त्या दुकानात मिळत. तेही दुकान फोडण्यात आले आणि दुकानातला माल थोड्याच वेळात अदृश्य झाला. माझे चुलते या सगळ्या प्रकारात अस्वस्थ होते. बाहेर जाऊ पाहणाऱ्या शेषेकाकांना त्यांनी सुरुवातीला आवरून धरले होते. लुटालुटीत भाग घ्यायचा नाही आणि काहीही घरी आणायचे नाही असे त्यांनी बजावले होते.

दोन-तीन तासांत ही गडबड आटोपली. चुलत्यांना काही शंका आली म्हणून त्यांनी बाहेर जाऊन पाहिले. बाबासाहेबांच्या दुकानातून थोडासा धूर येत होता. दुकान पेटवण्यासाठी तेथीलच गवत जमा करून कोणी तरी काडी लावली होती. चुलत्यांनी ते सर्व विझवले आणि गवत बाहेर आणून टाकले. बाबासाहेबांच्या दुकानातली एक वस्तू मात्र आम्ही न आणताच आमच्या वाड्याच्या दारात आली. त्यांच्या दुकानात काही रंगीत चित्रे विक्रीला होती. त्यांतली एक-दोन चित्रे मालाच्या फेकाफेकीत आमच्या वाड्याच्या दारात येऊन पडली होती. त्या चित्रातले एक गांधीजींचे होते. ते मी घरात घेऊन आलो.

रात्री बाबाबरोबर आम्ही सगळेच गच्चीवर गेलो. दूरवर एक-दोन ठिकाणी जाळ दिसू लागला होता. उजवीकडे नदीच्या काठावर राजगल्ली होती. तेथे मुस्लिम वस्ती होती. त्या भागातून वर आलेल्या ज्वाळा पाहून चुलत्यांनी अंदाज बांधला की अजिमोद्दीन साहेबांचे घर पेटले असावे. अजिमोद्दीन तहसीलदार होते आणि त्यांचा मुलगा बहाउद्दीन बाबांचा चांगला मित्र होता. जुन्या बाजारातील काही दुकाने पेटल्याचे दिसत होते. धोंडापुरात मात्र फारशी जाळपोळ झालेली दिसत नव्हती.

त्या रात्री वाड्यात विलक्षण अस्वस्थता होती. निजामाचे राज्य संपले होते. स्वातंत्र्य आले होते. रझाकारांची गुंडगिरी आता चालणार नव्हती. काका सुटणार होते. मात्र हा आनंद निर्भेळपणे उपभोगता येण्याऐवजी तो विषण्ण करणाऱ्या काही घटनांना बरोबर घेऊन आला होता.

सकाळी सगळे गाव उत्स्फूर्तपणे कंकालेश्वराकडे निघाले. कसलेही पूर्वनियोजन न करता एकमेकांना निरोप देऊन ती मिरवणूक निघाली होती. वाजंत्री नव्हते, मल्लखांब नव्हते पण प्रत्येकाच्या चेहऱ्यावर विलक्षण आनंद होता. अनेकांच्या डोक्यावर पाट आणि त्यावर काल विसर्जन न झालेले घरचे गणपती होते. दत्तमंदिरासारख्या ठिकाणी बसवलेले सार्वजनिक गणपतीही त्यात सामील झाले होते. अनेक वर्षे लोकांना गावाच्या सीमेवर असलेल्या कंकालेश्वराचे दर्शन घेता आले नव्हते. नासिरुद्दीन नावाच्या एका गुंडाने इतरांच्या आणि सरकारच्या साह्याने त्या देवळाचा ताबाच घेतला होता. कनकालेश्वराचे दर्शन हा बीडच्या लोकांसाठी स्वातंत्र्याचा आणखी एक अर्थ होता. कंकालेश्वराच्या भोवती चहुबाजूने पाणी होते. पाण्याच्या मोठ्या कुंडात मध्यभागी देऊळ होते आणि देवळाकडे कुंडातून जाण्यासाठी एक दगडी पूलही होता. अडथळा पाण्याचा नव्हता. गुंडगिरीचा होता. त्या दिवशी तो अडथळा दूर झाला होता. लोकांनी कंकालेश्वराच्या कुंडात गजाननाचे विसर्जन करण्याचे ठरविले होते. मिरवणूक निघाल्यानंतर कुण्यातरी बँडवाल्याने पाहिले आणि घाईघाईने जमतील तेवढे सहकारी बरोबर घेऊन तोही धावतपळत मिरवणुकीत सामील झाला. बंदोबस्त करायला पोलिसच नव्हते; पण त्यांची गरज नव्हती. लोक अतिशय शिस्तीने व शांतपणे चालले होते. 'मोरया रे मोरया, श्री गजानन मोरया' या घोषणेबरोबरच 'भारत माता की जय' याही घोषणा दिल्या जात होत्या. त्या दिवशी कंकालेश्वराला चार-पाच हजार लोक मिरवणुकीने

गेले आणि त्यांनी प्रथम त्या महादेवाचे दर्शन घेतले आणि नंतर लोकांनी आपापल्या गणपतीचे कुंडात विसर्जन केले. त्यापूर्वी बिंदुसरा नदीच्या पात्रात थोडेसे खोल पाणी पाहून विसर्जन करावे लागत असे.

मिरवणूक संपवून परत येताना काल रात्री फोडली गेलेली काही दुकाने दिसली. बुटा-चपलांची रिकामी खोकी, घाईघाईने लूट नेताना रस्त्यात पडलेल्या काही वस्तू दिसत होत्या. दुपारपर्यंत गावातले व्यवहार हळूहळू पूर्ववत सुरू होऊ लागले. काही दुकानेही उघडली. सायंकाळी दिवेलागणीच्या वेळेला एक-दोन गाड्यातून शेजारच्या अहमदनगर जिल्ह्यातल्या काही पोलिसांनी शहरात फेरफटका मारला. चौकाचौकात गाडी थांबवून ते कुतूहलाने जमलेल्या लोकांशी बोलत. बाहेरून व्यवस्थेसाठी आलेले पोलिस आणि इतर कर्मचारी यांच्यासाठी भोजनाची व्यवस्थाच नव्हती. त्यांनीच सुचवल्यावरून लोकांनी आपापल्या घरून काही भाकरी- पोळ्या, भाजी वगैरे जमा करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे तासाभरातच घरोघर जमतील तेवढ्या भाकरीपोळ्या तयार झाल्या आणि त्या थांबलेल्या पोलिसांच्या वाहनात पोहोचत्याही झाल्या. गावात पुन्हा एकदा चहलपहल सुरू झाली आणि कालची अस्वस्थता कमी झाली.

दुसऱ्या दिवशी सकाळी आणखी वातावरण निवळले. ज्यांचे नुकसान झाले होते त्यांनी आपल्या हानीचा अंदाज घेऊन शेजाऱ्यापाजाऱ्यांची मदत आणि सहानुभूतीच्या आधारे आपापले व्यापारी संसार पुन्हा उभे केले. बसलेल्या धक्क्यातून लोक सावरले. काही बाबतीत मात्र चित्र पूर्णत: बदललेले होते. आमच्या गल्लीतला बागवानाचा गनी अरेरावी करायचा. खांद्याला बंदूक लटकून फिरायचा. कामधंदा मात्र काहीच करायचा नाही. आमच्या वाड्याच्या जवळ औरादकरांच्या माडीत स्टेट काँग्रेसचे ऑफिस होते. ऑफिसवर गॅलरीत काँग्रेसचा तिरंगी ध्वज लावलेला होता. त्या ध्वजावर गनीने एकदा गोळी झाडली होती. योगायोगाने मीच त्या वेळी लांब पण गॅलरीतच उभा होतो. थरकाप उडविणारी ती घटना होती. आज घरातून गनी बाहेर पडला तेव्हा त्याची मान खाली होती. खांद्याला बंदूकही नव्हती. आपल्याकडे कुणाचे लक्ष जाऊ नये अशी त्याची इच्छा होती. पण कुणीतरी त्याला पाहिलेच. एक-दोन मुलांनी त्याला धरले. दोन-चार थपडा दिल्या आणि त्याला बाजारातल्या सगळ्या दुकानदारांच्या पाया पडायला लावले. खरे म्हणजे त्याची काही गरज नव्हती. गुंडगिरी शिकविणारे, भडकवणारे पळून गेले होते. आपल्या राजकीय स्वार्थासाठी गुंडप्रवृत्तींना पोसणारे राज्य संपले होते.

---

*न्या. नरेन्द्र चपळगावकर,*
*१३, जयनगर, दशमेशनगरजवळ,*
*औरंगाबाद - ४३१ ००५*